

# २०००-२००१

## यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई

## YASHWANTRAO CHAVAN PRATISHTHAN, MUMBAI

वार्षिक अहवाल

**ANNUAL REPORT**

**2000-2001**

## राष्ट्रीय पुरस्कार व राज्यस्तरीय पारितोषिक वितरण



यशवंतराव चव्हाण राष्ट्रीय पुरस्कार मान. नाम. दिग्विजय सिंह, मुख्यमंत्री - मध्यप्रदेश यांच्या हस्ते स्वीकारताना मान. श्री सुंदरलाल बहुगुणा, सोबत मान. श्री. शरदराव पवार, मान. माजी मुख्य न्यायमूर्ती (सुप्रीम कोर्ट) श्री. वाय. व्ही. चंद्रचूड आणि मान. श्री. मोहन धारिया



यशवंतराव चव्हाण ग्रामीण विकास पारितोषिक सर्च-शोधग्राम, गडचिरोली चे अध्यक्ष डॉ. अभय बंग यांना प्रदान करताना मा.नाम. विलासराव देशमुख मुख्यमंत्री. तसेच मान. नाम. छगनराव भुजबळ - उपमुख्यमंत्री, मान. श्री. शरदराव पवार आणि मान. श्री. मोहन धारिया

# वार्षिक अहवाल
# २००० - २००१

## यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबई

ट्रस्ट रजि.नं.एफ.१०६४३, दिनांक १७ सप्टेंबर १९८५, सोसायटी रजि.नं.एम.एम.एच/बी.ओ.एम-५३९/८५
यशवंतराव चव्हाण सेंटर, जन. जगन्नाथराव भोसले मार्ग, मुंबई-४०० ०२१

# यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबई

## वार्षिक अहवाल
## २००० - २००१

## अनुक्रमणिका


| | विषय | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १ | यशवंतराव चव्हाण केंद्रातील कार्यक्रम/उपक्रम | ४ |
| २. | यशवंतराव चव्हाण केंद्रातील झालेले महत्त्वाचे कार्यक्रम | ५ |
| ३. | प्रतिष्ठानने आयोजित केलेल्या स्पर्धा-पारितोषिक योजना | ६ |
| ४ | विशेष कार्यक्रम | ८ |
| ५. | माहिती व तंत्रज्ञान प्रबोधिनी | ९ |
| ६. | प्रतिष्ठानच्या सहकार्याने चालणारे महाराष्ट्रातील इतर कार्यक्रम | १० |
| ७. | यशवंतराव चव्हाण अध्यास शिष्यवृत्ती | ११ |
| ८. | प्रतिष्ठान मार्फत देण्यात आलेल्या देणग्या/अनुदाने | ११ |
| ९ | प्रतिष्ठानला मिळालेल्या देणग्या | ११ |
| १०. | प्रतिष्ठानच्या विभागामार्फत झालेले कार्यक्रम/उपक्रम | १२ |
| ११. | प्रतिष्ठानची नवी प्रकाशने | १७ |
| १२. | प्रतिष्ठानची विभागीय केंद्रे | १८ |
| १३. | वर्तापत्र | २२ |
| १४ | हिशोबी पत्रक व परिशिष्टे | २३ |
| १५ | वैधानिक लेखापरीक्षकाचा दाखला | ३५ |
| १६. | प्रतिष्ठानची विक्रीसाठी असलेली प्रकाशने | कव्हर मलपृष्ठ |

# यशवतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबई

ट्रस्ट रजि.नं.एफ.१०६४३, दिनांक १७ सप्टेंबर १९८५, सोसायटी रजि.नं.एम.एम.एच/बी.ओ.एम-५३९/८५
यशवंतराव चव्हाण सेंटर, जन. जगन्नाथराव भोसले मार्ग, मुंबई-४०० ०२१

## विश्वस्त मंडळ सदस्य

| | |
|---|---|
| १. मा. श्री. शरदराव पवार | अध्यक्ष<br>उपाध्यक्ष |
| २. मा. श्री. मोहन धारिया | कार्याध्यक्ष |
| ३. मा. श्री. श.गं. काळे | सरचिटणीस |
| ४. मा. श्री. कमलाकर म्हेत्रे | कोषाध्यक्ष |
| ५. मा. श्री. सुधाकरराव नाईक | (निधन दि.१०/५/२००१) |
| ६. मा. श्री. शिवाजीराव पाटील-निलंगेकर | |
| ७. मा. डॉ. निळकंठराव कल्याणी | |
| ८. मा. प्रा. पी.बी. पाटील | |
| ९. मा. श्री. राम प्रधान | |
| १०. मा. श्री. गुलाम गौस | |
| ११. मा. श्री. लक्ष्मण माने | |
| १२. मा. श्री. वसंतराव कार्लेकर | |
| १३. मा. श्री. ज्ञानेश्वर खैरे | |
| १४. मा. श्री. हुसेन दलवाई | |
| १५. मा. डॉ. रवि बापट | |
| १६. महाराष्ट्र शासन प्रतिनिधी | |
| १७. महाराष्ट्र शासन प्रतिनिधी | |

## कार्यकारिणी मंडळ सदस्य

१. मा. श्री. शरदराव पवार
२. मा. श्री. मोहन धारिया
३. मा. श्री. श.गं. काळे
४. मा. श्री. कमलाकार म्हेत्रे
५. मा. श्री. राम ताकवले
६. मा. श्री. ज्ञानेश्वर खैरे
७. मा. श्री. ना.धों. महानोर
८. मा. श्री. हुसेन दलवाई
९. मा. श्री. राममनोहर त्रिपाठी
१०. मा. डॉ. व्ही. सुब्रमण्यन्
११. मा. श्री. एन.के.पी. साळवे
१२. मा. श्री. के.बी. आवाडे
१३. मा. डॉ. रवि बापट
१४. मा. श्री. गिरीश गांधी
१५. मा. श्री. प्रेमानंद रुपवते
१६. मा. श्री. शिवाजीराव गि. पाटील
१७. मा. श्री. अप्पासाहेब उर्फ सा.रे. पाटील
१८. मा. श्री. अंकुशराव टोपे
१९ मा. श्री. शामराव पा. पाटील
मा. अध्यक्ष, सह्याद्री सहकारी साखर कारखाना, कराड-(पदसिद्ध)
२०. मा. श्री. सुरेश देशमुख
अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य सहकारी बँक लि.-मुंबई. (पदसिद्ध)
२१. महाराष्ट्र शासन प्रतिनिधी

## कार्यकारी समिती

१. मा. श्री. शरदराव पवार
२. मा. श्री. मोहन धारिया
३. मा. श्री. श.गं. काळे
४. मा. श्री. कमलाकर म्हेत्रे
५. मा. श्री. ज्ञानेश्वर खैरे
६. मा. श्री. हुसेन दलवाई
७. मा. डॉ. रवि बापट

मा.श्री.त्र्यं.भा.खेडकर-संचालक(प्रशासन)

# यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई
# सन २०००-२००१ चा वार्षिक अहवाल

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबईचा सन २०००-२००१ चा वार्षिक अहवाल पुढीलप्रमाणे सादर करीत आहोत.

## सभांचे कामकाजः

मा. यशवंतराव चव्हाण यांचे विचार व कार्याचा प्रसार करण्यासाठी प्रतिष्ठानतर्फे विविध प्रकारचे उपक्रम राबविण्यात येत असून त्यांची आखणी व अंमलबजावणी करण्यासाठी कार्यकारी समितीच्या बैठका सर्वसाधारणपणे महिन्यातून दोन वेळा घेण्यात आल्या व संबंधित विषयांवर निर्णय घेण्यात आले. सदर समितीचे सदस्य, पदाधिकारी, विविध विभागांचे प्रमुख नियमितपणे आपापले काम करीत आहेत. त्याचप्रमाणे विश्वस्त मंडळाच्या पाच व कार्यकारिणी मंडळाच्या चार सभा झाल्या.

## १. यशवंतराव चव्हाण केंद्रातील उपक्रमः

**अ) मुख्य सभागृहः** यशवंतराव चव्हाण केंद्रातील सभागृहाचा वापर, प्रतिष्ठानने आयोजित केलेल्या विविध कार्यक्रमासाठी तसेच निरनिराळ्या सामाजिक संस्था, शासनातर्फे आयोजित केलेल्या सभा, संमेलने, चर्चा, परिसंवाद, चित्रपट, सांस्कृतिक कार्यक्रम यासाठी करण्यात आला. मराठी, हिंदी, गुजराती व इंग्रजी नाटके, संगीतसभा आदी कार्यक्रमही वर्षभर झाले. मुख्य सभागृहाचे नूतनीकरण करुन आरामदायी खुर्च्या बसविण्यात आलेल्या आहेत. तसेच सभागृहातील गालिचे बदलण्यात आले व सभागृह सर्व सोयींनी युक्त व अद्यावत करण्यात आले आहे. सभागृहाचे डिमरबोर्डही बदलण्यात आले आहेत. त्याचप्रमाणे सभागृहात डॉल्बी म्युझिक सिस्टिम बसविण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे. त्यामुळे सभागृहाची मागणी वाढून प्रतिष्ठानच्या नांवलौकिकांत व उत्पन्नांत भर पडेल, असा विश्वास वाटतो. तसेच केंद्र इमारतीमध्ये सध्या कार्यरत असलेली वातानुकूलन यंत्रणा (पाण्याच्या प्रक्रियेवर चालणारी) खर्चिक असल्याने ती बदलून अत्याधुनिक वातानुकूलन यंत्रणा बसविण्याचा निर्णय वास्तुविशारद-मेसर्स शशी प्रभु ॲण्ड असोशिएटस्, मुंबई यांच्या सल्ल्याप्रमाणे घेण्यात आलेला आहे.

**ब) सांस्कृतिक सभागृहः** या सभागृहात आता कलाप्रदर्शनाचीही व्यवस्था करण्यात आली आहे. या कलादालनामध्ये अनेक मान्यवर कलाकारांची रंगचित्रे, छायाचित्रे, रेखाटनचित्रे व हस्तकलेच्या वस्तू यांची प्रदर्शने झाली. नवोदित कलाकारांना प्रोत्साहन देण्यासाठी कलादालनातर्फे 'मान्सून शो' तसेच ज्येष्ठ कलाकारांसाठी प्रदर्शने आयोजित करण्यात आली. देशाच्या व महाराष्ट्राच्या विकासाशी संबंधित सामाजिक, राजकीय व आर्थिक स्वरुपाच्या परिषदा, परिसंवाद व चर्चासत्रे घेण्यासाठी तसेच नवोदित कलाकारांना प्रोत्साहन देण्यासाठी मुख्य सभागृह, सांस्कृतिक सभागृह तसेच कलादालन कार्यकारी समितीच्या संमतीने सवलतीच्या दरात देण्यात येतात.

**क) यशवंतराव चव्हाण राष्ट्रीय ग्रंथालयः** प्रतिष्ठानच्या अनेक उद्दिष्टांपैकी सुसज्ज ग्रंथालय हे एक प्रमुख उद्दिष्ट आहे. ग्रंथालयात अनेक विषयांवरील ग्रंथ विकत घेतले असून मा. यशवंतराव चव्हाणसाहेबांच्या जीवनाच्या विविध पैलूंचे दर्शन घडविणारी पुस्तके तसेच त्यांनी स्वतः लिहिलेली पुस्तके ग्रंथालयात उपलब्ध आहेत. त्याचप्रमाणे अनेक विषयांवरील संदर्भ ग्रंथ उपलब्ध आहेत. वाचकांच्या सोयीसाठी झेरॉक्स मशिनचीही व्यवस्था करण्यात आलेली आहे. ग्रंथालयाचा जास्तीत जास्त वापर होण्याच्यादृष्टीने अनेक प्रकारची दैनिके, पाक्षिके, मासिके इत्यादी दर्जेदार साहित्य वाचकांसाठी उपलब्ध करून दिले जाते. ग्रंथालयाचे सभासद होण्यासाठी वार्षिक वर्गणी रुपये २५०/- आकारली जाते. विद्यार्थ्यांकडून सवलतीची वार्षिक वर्गणी रुपये २५/- घेतली जाते. यावर्षीही ग्रंथालयास महाराष्ट्र शासनाच्या ग्रंथालय संचालनालयाकडून आर्थिक अनुदान मिळाले आहे. प्रतिष्ठानच्या आजीव सदस्यांना ग्रंथालय विनामूल्य उपलब्ध आहे. यावर्षात विविध विषयावरील रुपये १,३५,२६०/- किंमतीचे ग्रंथ खरेदी करण्यात आले.

**ड) इंटरनेट प्लाझाः** सुमारे १०० विद्यार्थी आणि व्यावसायिकांनी इंटरनेट प्लाझाचा उपयोग करून घेतला आहे. प्रतिष्ठानच्या विविध विभागांना आवश्यक असलेली माहिती इंटरनेटमधून एकत्र करून देण्यात येते. इंटरनेट प्लाझासाठी डॉ. रवि बापट, विश्वस्त आणि श्री. अशोक नाडकर्णी यांचे मार्गदर्शन मिळते. या विभागात जास्तीत जास्त विद्यार्थ्यांना आकर्षित करण्याचा प्रयत्न चालू आहे.

**इ) केंद्र इमारतीमधील युरोपिन युनियन चेंबर ऑफ कॉमर्स इन इंडिया यांच्या सहकार्याने स्थापन केलेले संशोधन केंद्र:**

युरोपियन युनियन चेंबर ऑफ कॉमर्सच्या भारतीय विभागाचे सहकार्य प्रतिष्ठानच्या उपक्रमांना लाभत असून महाराष्ट्रातील व्यापार, उद्योग, सहकार या सामाजिक क्षेत्राच्या भरीव वृद्धीसाठी ते फार महत्वाचे आहे. युरोपियन युनियनचेंबर ऑफ कॉमर्स इन इंडियाद्वारे महाराष्ट्रातील निरनिराळ्या क्षेत्रात प्रकल्प उभारण्यासाठी आर्थिक मदत कशी उपलब्ध करून घेता येईल, त्याची माहिती प्रसिद्ध केली आहे. त्याचा फायदा उद्योजकास होईल. युरोपियन युनियनचेंबर ऑफ कॉमर्स इन इंडियातर्फे केंद्र इमारतीत संशोधन केंद्र स्थापन करण्यात आले असुन त्यामधून भारत व युरोपमधील व्यापार, उद्योग व अन्य क्षेत्रातील माहिती सत्वर मिळते. युरोपिन युनियन चेंबर ऑफ कॉमर्स इन इंडियाच्या अधिकाऱ्यांशी व प्रतिनिधींशी प्रतिष्ठानने वेळोवेळी निरनिराळ्या प्रकल्पांबाबत उपयुक्त चर्चा केली आहे. श्री. वी.पी. गुणाजी, कार्यकारी अधिकारी, युरोपियन युनियन चेंबर ऑफ कॉमर्स इन इंडिया यांचे प्रतिष्ठानला मोलाचे साहाय्य झाले. त्यांचे अलिकडेच दु:खद निधन झाले आहे.

**ई) महाराष्ट्र आर्थिक विकास मंडळ:**

महाराष्ट्र आर्थिक विकास मंडळ या संस्थेची स्थापना प्रसिद्ध अर्थशास्त्रज्ञ कै. डॉ. धनंजयराव गाडगीळ यांनी सन १९५७ मध्ये केली. ही संस्था महाराष्ट्राचा आर्थिक व औद्योगिक विकास वेगाने आणि संतुलितपणे होण्यासाठी संशोधनाचे कार्य करते. महाराष्ट्रामध्ये उद्योग सुरू करण्यासाठी इच्छुक असणाऱ्या उद्योजकांना सांख्यिकीय माहिती पुरविणे, उद्योजकाला योग्य निर्णय घेण्यासाठी राज्य शासनाच्या धोरणात्मक निर्णयांची माहिती देणे, उद्योजकांना चिकित्सकपद्धतीने अधिकृत आकडेवारी पुरविणे तसेच महाराष्ट्रात उपलब्ध असलेल्या उद्योगसंधीविषयी माहिती देण्याचे काम ही संस्था करते. संस्थेतर्फे उद्योजकांसाठी परिसंवाद, परिषदा व कार्यशाळा आयोजित केल्या जातात. सदरची संस्था व यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई यांनी एकमेकांच्या सहकार्याने काम करण्याचे ठरविले आहे. त्यामुळे महाराष्ट्रातील उद्योगधंद्यांना चालना मिळेल, असा विश्वास वाटतो. त्यासाठी महाराष्ट्र आर्थिक विकास मंडळाला संशोधनासाठी केंद्र इमारतीतील जागा उपलब्ध करून देण्यात आली आहे. या दोन्ही संस्थांच्या सहकार्याने **'महाराष्ट्राची चार दशकांतील वाटचाल : एक आढावा' हे इंग्रजी पुस्तक नुकतेच प्रकाशित करण्यात आले.**

**उ) अनुबोधपट:**

कॉ. श्रीपाद अमृत डांगे यांच्या जीवनावर अनुबोधपट तयार करण्याचे काम श्री. विनय नेवाळकर यांना देण्यात आलेले असून ते काम प्रगतिपथावर आहे. मा. चव्हाणसाहेबांच्या जीवनावर अनुबोधपट तयार करण्याचे काम डॉ. जब्बार पटेल यांचेकडे सोपविण्यात आलेले असून या उपक्रमासाठी महाराष्ट्र शासनाकडून आर्थिक साहाय्य मिळविण्यासाठी प्रतिष्ठान प्रयत्नशील आहे.

## २) यशवंतराव चव्हाण केंद्रात झालेले महत्त्वाचे कार्यक्रम:

### अ) मा.चव्हाणसाहेबांची पुण्यतिथि व जयंती:

मा.चव्हाणसाहेबांच्या १६ व्या पुण्यतिथी निमित्त दि. २५ नोव्हेंबर २००० रोजी चव्हाण सेंटरच्या मुख्य सभागृहात झालेल्या कार्यक्रमास प्रमुख अतिथी म्हणून मा. ना. विलासरावजी देशमुख, मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य उपस्थित होते व अध्यक्षस्थान मा. श्री. शरदराव पवार यांनी भूषविले होते. सदर कार्यक्रमात मा. यशवंतराव चव्हाण यांच्या संसदेतील निवडक भाषणांचे श्री. राम प्रधान, विश्वस्त यांनी संपादित केलेले खंड ३ व ४ यांचे प्रकाशन करण्यात आले. त्याचप्रमाणे मा. यशवंतराव चव्हाण यांच्या 'सहयाद्रीचे वारे' या मराठी पुस्तकाचे शासनाने हिंदीमध्ये भाषांतरित केलेले 'हवाएँ सहयाद्री की' हे पुस्तक व 'महाराष्ट्राची चार दशकांतील वाटचाल : एक आढावा' हे प्रतिष्ठान व महाराष्ट्र आर्थिक विकास मंडळ यांनी संयुक्तरित्या संपादित केलेले इंग्रजी पुस्तक यांचे प्रकाशन प्रमुख अतिथींच्या हस्ते करण्यात आले.

या कार्यक्रमात यशवंतराव चव्हाण ग्रामीण विकास राज्यस्तरीय पारितोषिक २००० 'सर्चशोधग्राम', गडचिरोली, या संस्थेला प्रदान करण्यात आले व यशवंतराव चव्हाण राष्ट्रीय पुरस्कार २००० जाहीर करण्यात आला. याच कार्यक्रमात महाविद्यालयीन नियतकालिकांच्या स्पर्धेमध्ये सर्वोत्कृष्ट ठरलेल्या विजेत्यांची नावे जाहीर करून प्रतिष्ठाने आयोजित केलेल्या विविध स्पर्धांच्या बक्षिसांचे वितरण आणि 'यशवंतराव चव्हाण युवा पुरस्कार २०००' चे वितरण करण्यात आले.

मा. यशवंतराव चव्हाण यांचा ८८ वा जयंती समारंभ सोमवार दि. १२ मार्च २००१ रोजी चव्हाण सेंटरच्या मुख्य सभागृहात संपन्न झाला. समारंभाचे प्रमुख अतिथी मा. ना. दिग्विजय सिंह, मुख्यमंत्री, मध्यप्रदेश हे होते. तसेच समारंभाच्या अध्यक्षस्थानी मा. श्री. शरदराव पवार होते. त्यावेळी महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री मा. ना. छगनराव भुजबळ उपस्थित होते. या कार्यक्रमात यशवंतराव चव्हाण राष्ट्रीय पुरस्कार २०००, मा. श्री. सुंदरलालजी बहुगुणा, ज्येष्ठ स्वातंत्र्यसेनानी आणि पर्यावरवादी नेते यांना प्रदान करण्यात आला. वरील दोन्ही कार्यक्रमास प्रतिष्ठित मान्यवरांची मोठ्या प्रमाणावर उपस्थिती होती.

### ब) यशवंतराव चव्हाण राज्यस्तरीय पारितोषिक:

प्रतिष्ठानच्या उद्दिष्टांमधील एक भाग म्हणून खालीलक्षेत्रात भरीव कार्य करणाऱ्या मान्यवर व्यक्ती वा संस्थेला चक्राकारपद्धतीने पारितोषिक व सन्मानपत्र देण्यात येते.

१. यशवंतराव चव्हाण कृषी-औद्योगिक समाजरचना पारितोषिक.
२. यशवंतराव चव्हाण सामाजिक एकात्मता पारितोषिक.
३. यशवंतराव चव्हाण ग्रामीण विकास पारितोषिक.
४. यशवंतराव चव्हाण मराठी साहित्य संस्कृती पारितोषिक.

यावर्षीचे 'यशवंतराव चव्हाण ग्रामीण विकास राज्यस्तरीय पारितोषिक २०००' व सन्मानपत्र **'सर्च-शोधग्राम, गडचिरोली'** या संस्थेचे **अध्यक्ष डॉ. अभय बंग** यांना मा. चव्हाणसाहेबांच्या पुण्यतिथीदिनी (२५ नोव्हेंबर २०००) रोजी **मा. ना. विलासराव देशमुख, मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य** यांच्या हस्ते, **मा. श्री. शरदराव पवार** यांच्या प्रमुख उपस्थितीत प्रदान करण्यात आले. यावर्षीपासून पारितोषिकाची रक्कम वाढवून रु.१ लाख इतकी करण्यात आली.

### क) यशवंतराव चव्हाण राष्ट्रीय पुरस्कार:

मा. यशवंतराव चव्हाणसाहेबांच्या स्मृतिप्रीत्यर्थ राष्ट्रीय एकात्मता, लोकशाहीमूल्ये, सामाजिक-आर्थिक विकास या क्षेत्रामध्ये उत्कृष्ट कार्य करणाऱ्या नामवंत व्यक्तीला 'यशवंतराव चव्हाण राष्ट्रीय पुरस्कार व मानपत्र' देण्यात येते. यावर्षीपासून पुरस्काराची रक्कम रूपये २ लाख करण्यात आली असून सुयोग्य व्यक्तींची निवड करण्यासाठी सर्वोच्च न्यायालयाचे माजी मुख्यन्यायाधीश वाय.व्ही.चंद्रचूड यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नेमण्यात आली आहे. या समितीचे सदस्य मा. श्री. आय.के.गुजराल, माजी पंतप्रधान, डॉ. श्रीमती नजमा हेपतुल्ला, उपाध्यक्ष राज्यसभा, डॉ. होमी सेठना, डॉ. एम.एस. स्वामीनाथन्, डॉ. भालचंद्र मुणगेकर, कुलगुरु, मुंबई विद्यापीठ, (पदसिद्ध पद्धतीने) आणि सुप्रसिद्ध संगीतकार मा. श्री. भूपेन हजारीका हे आहेत. निवड समितीच्या शिफारशीनुसार यावर्षीचा राष्ट्रीय पुरस्कार **मा. श्री. सुंदरलाल बहुगुणा, पर्यावरण नेते** यांना देण्याचे मान्य होऊन मा. चव्हाणसाहेबांच्या जयंतीदिनी म्हणजे (१२ मार्च २००१) रोजी **मा. ना. दिग्विजयसिंह, मुख्यमंत्री, मध्यप्रदेश** यांच्या हस्ते व **मा. श्री. शरदराव पवार** यांच्या प्रमुख उपस्थितीत सन्मानपूर्वक देण्यात आला.

### ड) यशवंतराव चव्हाण युवा पुरस्कार वितरण:

**महाराष्ट्रात उत्कृष्ट सामाजिक** काम करणाऱ्या युवकास नवभारत युवा आंदोलनाच्या वतीने देण्यात येणारा 'यशवंतराव चव्हाण युवा पुरस्कार २०००' यावर्षी **श्रीमती मनिषा तोकले, बीड व श्री. हरीश सदानी, मुंबई** यांना देण्यात आला. '**रोख रक्कम** रु. ११०००/- व सन्मानपत्र' असे या पुरस्काराचे स्वरुप आहे.

## ३. प्रतिष्ठानने आयोजित केलेल्या स्पर्धा-पारितोषिक योजना:

### अ) खुली निबंध स्पर्धा:

दरवर्षी खुली निबंध स्पर्धा आयोजित करण्यात येते. यावर्षी

*१. आंतरराष्ट्रीय आतंकवाद व त्याचे भारतावरील परिणाम.*
*२. घटकराज्यांची स्वायत्तता व राष्ट्रीय ऐक्य.*

*हे दोन विषय निवडण्यात आले होते. वरील स्पर्धेचे परीक्षक म्हणून श्री. जयंत गडकरी यांनी काम केले. प्रथम पारितोषिक रु. ५०००/- श्री. हेमराज बागुल, नाशिक, द्वितीय पारितोषिक रु. ३०००/- श्री. देवेंद्र सुर्वे, चरई, जिल्हा-ठाणे, तृतीय पारितोषिक रु. २०००/- श्री. सुदत्त शंकर गोटेकर, कल्याण-पूर्व, जि-ठाणे यांना जाहीर होऊन मा. चव्हाणसाहेबांच्या पुण्यतिथीदिनी समारंभपूर्वक देण्यात आले.*

## ब) यशवंतराव चव्हाण महाविद्यालयीन नियतकालिके पारितोषिक योजनाः

महाराष्ट्रातील निरनिराळ्या विद्यापीठाकडून त्यांच्याकडे प्राप्त झालेली महाविद्यालयांची नियतकालिके प्रतिष्ठानकडे मागविण्यात येतात. त्यांची छाननी परीक्षकांकडून करून घेण्यात येते. यावर्षी प्रा. रविकांत देवगडकर, श्रीमती प्रा. प्रज्ञा लोखंडे आणि श्री. अरविंद वैद्य यांनी नियतकालिकांचे परीक्षण केले.

| पारितोषिक | नियतकालिकाचे नांव | महाविद्यालयाचे नांव | विद्यापीठ |
|---|---|---|---|
| प्रथम रु. १५०००/- | प्रत्यंचा | इंजिनिअरींग कॉलेज, पुणे | पुणे विद्यापीठ |
| द्वितीय रु. १०,०००/- | एकलव्य | कला, वाणिज्य विद्यालय, नवापूर, धुळे | उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ |
| तृतीय रु. ५०००/- | शब्दगंध | राजर्षि शाहू महाराज महाविद्यालय, लातूर | रामानंदतीर्थ मराठवाडा-विद्यापीठ |
| उत्तेजनार्थ | विवेक | विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर | शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर |
| | ऑर्बिट | एस.बी.ई.एस.कॉलेज ऑफ सायन्स, औरंगाबाद | डॉ. बाबासाहेब आंबेडकर, मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद |

## क) यशवंतराव चव्हाण महाविद्यालयीन साहित्य पारितोषिक योजनाः

महाविद्यालयातील १२ वी उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांसाठी 'यशवंतराव चव्हाण महाविद्यालयीन साहित्य पारितोषिक' ही योजना प्रतिष्ठानने लेख, कथा व कविता या तीन साहित्य प्रकारांकरीता आयोजित केली होती. सदर स्पर्धेसाठी परीक्षक म्हणून श्रीमती उल्का महाजन, श्री. आ.ना. पेडणेकर व श्री. निळकंठ कदम यांनी काम पाहिले. या योजनेत खालील स्पर्धक विजयी ठरले.

### लेख

| पारितोषिक | विजेत्याचे नाव | विषय | कॉलेजचे नांव |
|---|---|---|---|
| प्रथम रु. ३००० | श्री. जोश सुहास एकसंबेकर | '२१ वे शतक व भारतीय शिक्षणव्यवस्थेची पुनर्रचना' | शहाजी लॉ कॉलेज, कोल्हापूर |
| द्वितीय रु. २००० | कु. विद्या मारुती हातकर | 'आजची स्त्री खरोखरच स्वतंत्र आहे का?' | महिला महाविद्यालय, गडहिंग्लज, कोल्हापूर |
| तृतीय रु. १००० | श्री. विनोद विष्णू जुमडे, | 'पंचशिलेची शिकवण : एक ऐतिहासिक क्रांती' | मिलिंद कला महाविद्यालय, औरंगाबाद |
| उत्तेजनार्थ | कु. सरिता मनोहर भोसले | 'एकविसाव्या शतकातील निरंतर शिक्षण' | शिवराज महाविद्यालय, कोल्हापूर |
| उत्तेजनार्थ | श्री. योगेश महारु सुर्यवंशी | 'नव्या शतकातील युवकांपुढील आव्हाने' | आबासाहेब सोनावणे महाविद्यालय, नाशिक |

### कथा

| पारितोषिक | विजेत्याचे नाव | कथा | कॉलेजचे नांव |
|---|---|---|---|
| प्रथम रु.३००० | श्री. गेणू शिंदे, | 'डस' | विवेकानंद कला, वाणिज्य महाविद्यालय, औरंगाबाद |
| द्वितीय रु. २००० | श्री. नरेश गवळी | 'निवत' | मराठी विभाग, पुणे विद्यापीठ |
| तृतीय रु. १००० | श्री. अनिल कृष्णाजी पडोळे, | 'उद्याची पहाट' | यशवंत महाविद्यालय, वर्धा |
| उत्तेजनार्थ | श्री. हेमराज काशिनाथ बागुल | 'पोस्टमॉर्टम' | एच.पी.टी.आर्टस अॅण्ड आर.वाय.के सायन्स कॉलेज, नाशिक |

## कविता

| पारितोषिक | विजेत्याचे नाव | कवितेचे नांव | कॉलेजचे नांव |
|---|---|---|---|
| प्रथम रु. ३००० | श्री अरुण व. रसाळ | 'माय' | मिलिंद कॉलेज ऑफ आर्टस, औरंगाबाद |
| द्वितीय रु. २००० (विभागून) | श्री. सुधीर दि. पिणचेकर, | 'सुखाची भाकर' | डॉ. घाळी कॉलेज, गडहिंग्लज, जि-कोल्हापूर |
| द्वितीय रु. २००० (विभागून) | श्री. हेमराज बागुल | 'माणूस डॉट कॉम' | एच.पी.टी. आर्टस् अ‍ॅण्ड आर.वाय.के. सायन्स कॉलेज नाशिक |
| तृतीय रु. १००० (विभागून) | श्री. दिपककुमार द.वाघ | 'क्रांती' | कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, कोपरगांव, |
| तृतीय रु. १००० (विभागून) | श्री. विनोद वि.जुमडे, | 'माझ्या देशावर माझं प्रेम आहे' | मिलिंद कला महाविद्यालय, औरंगाबाद |
| उत्तेजनार्थ | श्री. पोपट ना. वाबळे<br>श्री. विलास तु. स्वरात<br>श्री. विष्णु म. थोरे | 'अस्तित्व'<br>'पावसाची कविता'<br>'दुवळी झाली गाथा' | तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय, बारामती<br>मिलिंद कॉलेज ऑफ आर्टस, औरंगाबाद<br>एम.जी.महाविद्यालय, मनमाड |

## ४. विशेष कार्यक्रम:

### अ) मा.ना.धों. महानोर यांचा प्रतिष्ठानतर्फे सत्कार:

प्रतिष्ठानचे संस्थापक सदस्य व कार्यकारिणी मंडळाचे सदस्य **सुप्रसिद्ध निसर्गकवी मा.ना.धों महानोर यांच्या 'पानझड'** या कवितासंग्रहास यावर्षीचा **साहित्य अकादमी पुरस्कार मिळाला**. २२ भारतीय भाषांपैकी एका भाषेतील उत्कृष्ट साहित्यकृतीस प्रदान केला जाणारा हा पुरस्कार साहित्य व संस्कृति क्षेत्रांत अत्यंत प्रतिष्ठेचा समजला जातो. श्री. महानोर यांना हा मानाचा पुरस्कार मिळाल्याबद्दल प्रतिष्ठानच्या वतीने २७ फेब्रुवारी २००१ रोजी त्यांचा सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी प्रतिष्ठानचे **अध्यक्ष मा. शरदराव पवार** होते व **श्रीमती विजया राजाध्यक्ष**, अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षा, या प्रमुख अतिथि म्हणून उपस्थित होत्या. सदरचा कार्यक्रम प्रतिष्ठानच्या रंगस्वरतर्फे आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रतिष्ठानचे विश्वस्त मा. श्री. हुसेन दलवाई यांनी केले. सत्कार समारंभास सुप्रसिद्ध गायिका श्रीमती आशा भोसले यांच्या उपस्थितीमुळे व उत्स्फूर्त भाषणाने विशेष शोभा आली. सत्कार समारंभानंतर श्री. महानोर यांनी आपल्या निवडक कवितांचे रसग्रहणपूर्वक सादरीकरण केले. याप्रसंगी **श्रीमती जोनाकी जब्बार पटेल** यांनी तयार केलेली श्री. ना.धों.महानोर यांच्या चित्रपट संगीतावर आधारित चित्रफीत उपस्थितांना दाखविण्यात आली.

### ब) स्थानिक स्वराज्य संस्था-वित्त आयोग कार्यशाळा:

महाराष्ट्र राज्य वित्त आयोग व प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने दि.१५ नोव्हेंबर २००० रोजी **'स्थानिक स्वराज्य संस्थांना द्यावयाचे आर्थिक अधिकार'** ही कार्यशाळा **चव्हाण सेंटरमध्ये** आयोजित केलेली होती. या कार्यशाळेसाठी कृषी व सहकार व्यासपीठाने श्री. ज्ञानेश्वर मोरे यांच्या मार्गदर्शनाखाली चर्चेसाठी एक प्रबंध सादर केला होता. सदर कार्यशाळेचे अध्यक्ष म्हणून प्रतिष्ठानचे कार्याध्यक्ष **मा.श्री. मोहन धारिया** उपस्थित होते. तर बीजभाषण वित्त आयोगाचे तत्कालीन अध्यक्ष **मा. श्री.के.सी.श्रीवास्तव** यांनी केले. कार्यशाळेचा समारोप **मा. नाम.आर.आर.पाटील, मंत्री, ग्रामीण विकास** यांनी केला. कार्यशाळेला महाराष्ट्रातील स्थानिक स्वराज्य संस्थांचे प्रतिनिधी व काही शासकीय अधिकारी उपस्थित होते.

क) **ग्रंथोत्सव:**

मा. पंडित जवाहरलाल नेहरू आणि मा. यशवंतराव चव्हाण या दोघांचे ग्रंथप्रेम लक्षात घेऊन, तसेच १४ नोव्हेंबर हा पंडितजींचा जन्मदिवस व २५ नोव्हेंबर श्री यशवंतरावजींची पुण्यतिथी या संस्मरणीय घटना लक्षात घेऊन यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई, लोकसत्ता व ग्रंथाली यांच्या संयुक्त विद्यमाने दि. ११ नोव्हेंबर ते १९ नोव्हेंबर २००० पर्यंत चव्हाण सेंटरमध्ये **'ग्रंथोत्सव २०००'** आयोजित करण्यात आला.

ग्रंथोत्सवाचे उद्घाटन लोकसत्ताचे संपादक श्री. अरुण टिकेकर यांनी केले. ग्रंथोत्सवासाठी केंद्र इमारतीमध्ये जवळजवळ ६८ स्टॉल्स उभारण्यात आले होते. 'ग्रंथोत्सव २०००'च्या काळात **'कोण बनेल वाचस्पती'** हा नावीन्यपूर्ण कार्यक्रम श्रीमती माधवी कामत व श्रीमती अमला नेवाळकर यांच्या मदतीने आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमात अनेक वाचकांनी भाग घेतला व विजयी स्पर्धकांना पुस्तक रूपाने बक्षिसे देण्यात आली. त्याचप्रमाणे स्ट्रॅन्ड बुक स्टॉलचे मालक **श्री. टी.एन्. शानभाग** यांची विज्ञान विषयक पुस्तकांनी **'पुस्तकतुला'** करण्यात आली व ती पुस्तके मराठी विज्ञान परिषद मुंबई या संस्थेला भेट म्हणून देण्यात आली. याशिवाय **'ग्रंथोत्सव २०००'** ला जोडून दर्जेदार सांस्कृतिक कार्यक्रमही सादर करण्यात आले.

## ५. माहिती व तंत्रज्ञान प्रबोधिनी:

१० मे १९९९ रोजी कार्यरत झालेल्या माहिती व तंत्रज्ञान प्रबोधिनीची प्रगति चालु असून डिप्लोमा इन इन्फर्मेशन टेक्नॉलॉजी (डीआयटी) व डिप्लोमा इन ॲडव्हान्सड् कॉम्प्युटींग (डॅक) या शिक्षणक्रमाचे वर्ग घेण्यात आले तसेच प्री-डॅक, एडीआयटी आणि इतर तांत्रिक घटक स्वरुपाचे (मॉड्युलर) शिक्षणक्रम घेण्यात आले. काही विद्यार्थ्यांना बहि:शाल शिक्षणही देण्यात आले. सन २०००-२००१ या वर्षात खालीलप्रमाणे वर्ग घेण्यात आले.

१. **डिप्लोमा इन ॲडव्हान्सड् कॉम्प्युर्टींग (डॅक):** ऑगस्ट २००० व फेब्रुवारी २००१ असे सहा महिन्याचे दोन शिक्षणक्रम सुरु करण्यात आले. त्याला अनुक्रमे ११८ व १३७ विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला. ऑगस्ट २००० च्या वर्गातील, श्री. अली अजगर पॉकिटवाला हा विद्यार्थी ८५ टक्के गुण मिळवून प्रतिष्ठानच्या विद्यार्थ्यांत पहिला आला तर श्री. विनय पेनुली ८३ टक्के गुण मिळवून दुसरा आला व श्रीमती श्वेता ठक्कर ८१.५ टक्के गुण मिळवून तिसरी आली. सदर शिक्षणक्रमात अ वर्गात २५, ब+ वर्गात ७७, ब वर्गात .२२ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. पहिल्या तीन क्रमांकाने उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना प्रतिष्ठानतर्फे उत्तेजनार्थ अनुक्रमे रुपये २०००/-, रुपये १५००/- व रुपये १०००/- ची बक्षिसे देण्यात आली.

२. **प्री-डॅक:** यावर्गात २८ विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला व त्यांना डॅकच्या परीक्षेची पूर्व तयारी करून घेऊन डॅकच्या मुख्य परीक्षेला बसविण्यात आले.

३. **कंपन्यांमधून निवड:** ऑगस्ट २००० च्या वर्गातील ६५ टक्के विद्यार्थ्यांना प्रतिष्ठानमधील मुलाखतींतून नोकऱ्या मिळाल्या आहेत.

४. **ॲडव्हान्सड् डिप्लोमा इन इन्फर्मेशन टेक्नॉलॉजी (एडीआयटी):** सदरचा शिक्षणक्रम मे २००० रोजी सुरु होऊन मार्च २००१ मध्ये संपला. या वर्गात २७ विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला व ते एप्रिल २००१ मध्ये होणाऱ्या परीक्षेला बसले. याच शिक्षणक्रमाच्या दुसऱ्या वर्गाची सुरुवात २२ जानेवारी २००१ रोजी झालेली असुन त्या वर्गात २० विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला आहे.

५. **डिप्लोमा इन इन्फर्मेशन टेक्नॉलॉजी (डीआयटी):** या शिक्षणक्रमाचे ४ वर्ग चालविण्यात आले.

| | वर्ग | विद्यार्थी |
|---|---|---|
| अ. | एप्रिल २००० | १२९ |
| ब. | जुलै २००० | १५४ |
| क. | ऑक्टोबर २००० | ९५ |
| ड. | जानेवारी २००१ | १०७ |

शिवाय भारतीय नौदलाच्या २२ विद्यार्थ्यांचा एक वर्ग घेण्यात आला. प्रतिष्ठानच्या तसेच माहिती व तंत्रज्ञान प्रबोधिनीच्या सेवकांना क्रमाक्रमाने संगणक प्रशिक्षण देण्यात आले.

**ई) प्रतिष्ठानचे सॉफ्टवेअर डेव्हलपमेंट व रिसर्च सेंटर:**

प्रतिष्ठानमध्ये सॉफ्टवेअर डेव्हलपमेंट व रिसर्च सेंटर-स्थापन करण्यात आलेले असून सी-डॅक, पुणे या संस्थेबरोबर प्रतिष्ठानने मेमोरेंडम ऑफ अंडरस्टॅंडींग (एम.ओ.यु.) केले आहे.

वरील सर्व संगणक शिक्षणक्रमांसाठी आधुनिक पद्धतीची यंत्रसामुग्री प्रतिष्ठानने खरेदी केली आहे. संगणक वर्ग व संगणक प्रयोगशाळा सर्व सोयींनी सुसज्ज करण्यात आली आहे. यासाठी लागणारा प्रशिक्षित सेवकवर्ग नेमण्यात आला आहे. माहिती व तंत्रज्ञान प्रबोधिनीचे संचालक निवृत्त ब्रिगेडियर श्री. सुशील गुप्तन्, मुख्य तांत्रिक अधिकारी, श्री. मयूर परांजपे व मुख्य पणन व सेवायोजन अधिकारी म्हणून श्री. विक्रम वासुदेव हे काम पाहतात. रॉयल वेस्टर्न इंडिया टर्फ क्लब लि. चॅरिटीज् फंड यांच्याकडून प्रतिष्ठानला मिळालेल्या देणगीतून पुढील वर्षी शारीरिक अपंगत्व असलेल्या व्यक्तिंसाठी स्वतंत्र वर्ग सुरु करण्याचा विचार आहे.

## ६. प्रतिष्ठानच्या सहकार्याने चालणारे (महाराष्ट्रातील) इतर कार्यक्रम:

### अ) यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई व युरोपियन युनियन आणि महाराष्ट्र शासन यांच्या संयुक्त विद्यमाने पंचायत राज प्रशिक्षणाचा कार्यक्रम:

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई व युरोपियन युनियन आणि महाराष्ट्र शासन यांच्या संयुक्त विद्यमाने महाराष्ट्रभर पंचायत राज प्रशिक्षणाचा कार्यक्रम राबविण्यात आला. यासंबंधी युरोपियन युनियनबरोबर मार्च १९९५ मध्ये करार करण्यात आला होता. या कार्यक्रमास युरोपियन युनियनने टप्प्याटप्प्यानी ३१.३.२००१ पर्यंत मुदतवाढ दिली होती. प्रतिष्ठानला सदर कार्यक्रमासाठी रु. ८८ लाख युरोपियन युनियनकडुन आर्थिक मदत मंजूर झाली होती. आतापर्यंत रु.४८ लाख प्राप्त झाले असून सुमारे रु. ४० लाख खर्च झालेला आहे. दि. ३१.३.२००१ पर्यंत सुमारे १ लाख ग्रामपंचायत सदस्यांना प्रशिक्षण देण्यात आलेले आहे. सन २०००-२००१ पासून महाराष्ट्र शासनाने पंचायत प्रशिक्षणाचा कार्यक्रम स्वत: राबविण्याचे ठरविले आहे. ग्रामपंचायतींच्या उपयोगासाठी प्रतिष्ठानने **'नवे पंचायत राज'** हे पुस्तक छापले असुन त्यांच्या प्रती २७००० ग्रामपंचायतीना मोफत पाठविण्यात आलेल्या आहेत.

### ब) भारतीय भटके विमुक्त संशोधन संस्था, सातारा संशोधन प्रकल्प:

भारतीय भटके विमुक्त संशोधन संस्था, सातारा यांनी महाराष्ट्रातील भटक्या जमातींच्या विषयी पथदर्शक प्रकल्प जून १९९९ पासून सुरु केला आहे. पहिल्या टप्प्यात १८ जिल्ह्यांचे सर्वेक्षण पूर्ण केले असून उर्वरित जिल्ह्यांचे सर्वेक्षण पूर्ण करण्याचे काम चालू आहे. त्यासाठी प्रतिष्ठानने १,५०,०००/- अनुदान मंजूर केलेले आहे. संस्थेला आतापर्यंत रुपये १,००,०००/- चे अनुदान देण्यात आलेले आहे.

### क) अंधश्रद्धा निर्मुलन कार्यक्रम:

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबई, व महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती, सातारा यांच्या संयुक्त विद्यमाने महाराष्ट्रभर अंधश्रद्धा निर्मूलन, वैज्ञानिक दृष्टिकोन व महाराष्ट्रातील संत आणि समाजसुधारकांचा सत्यशोधकी वारसा याविषयक प्रबोधनाचे कार्यक्रम राबविले जातात. तसेच 'सत्यशोध प्रज्ञा परीक्षा' मार्फत महाराष्ट्रातील प्राथमिक व माध्यमिक शिक्षकांची तसेच प्राध्यापकांची शिबीरे घेतली जातात व परीक्षा घेतली जाते. प्रशिक्षणार्थींना प्रकल्पाचे अध्यक्ष डॉ. वसंतराव गोवारीकर व प्रतिष्ठानचे कार्याध्यक्ष मा. मोहन धारिया यांच्या सहीचे प्रमाणपत्र दिले जाते.

### ड) ज्ञानयज्ञ (ग्रंथाली) प्रकल्प:

दि. ५.११.१९९८ रोजी झालेल्या विश्वस्त मंडळाच्या बैठकीमध्ये श्री. दिनकर गांगल, सचिव, ग्रंथाली यांनी पत्र लिहून अशी माहिती दिली की. १००० दिवसांमध्ये १००० पुस्तके प्रकाशित करून ज्ञानयज्ञ प्रकल्पाद्वारे महाराष्ट्रातील किमान १००० गावामध्ये पोहचविण्याचा संकल्प आहे. यावर विचार होऊन या प्रकल्पासाठी प्रतिष्ठानने रु.३ लाख मदत देण्याचे मान्य केले. या प्रकल्पासाठी प्रतिष्ठानने आतापर्यंत १.५० लाखाची आर्थिक मदत केली आहे.

### इ) प्रथम मुंबई शिक्षण उपक्रम:

'प्रथम-मुंबई शिक्षण उपक्रम' या संस्थेच्या उपक्रमाला प्रतिष्ठान सहकार्य उपलब्ध करून देते. त्यास अनुसरून 'प्रथम'च्या कार्यालयासाठी केंद्र इमारतीतील जागा उपलब्ध करून देण्यात आली आहे व त्या जागेत 'प्रथम'ने आपले कार्यालय उभारले आहे. मुंबई शहरात झोपडपट्टीवासियांच्या मुलांना शिक्षणाची गोडी लागावी म्हणून बालवाड्या

चालविणे, संगणकांचे प्रशिक्षण देणे, झोपडपट्टीतील स्थानिक रहिवाशांमधून उपक्रमाकरिता शिक्षक-शिक्षिका तयार करणे इत्यादी महत्वपूर्ण काम 'प्रथम-मुंबई शिक्षण उपक्रमा'मार्फत डॉ. माधव चव्हाण व श्रीमती फरिदा लांबे यांच्या मार्गदर्शनाखाली मोठ्याप्रमाणावर केले जाते.

**ई) इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ पब्लिक अँडमिनिस्ट्रेशन, महाराष्ट्र शाखा:** या संस्थेच्या वतीने दरवर्षी यशवंतराव चव्हाण मेमोरियल लेक्चर आयोजित करण्यात येते. सदर संस्थेने यावर्षी डॉ. रघुनाथराव माशेलकर, डायरेक्टर जनरल-कौन्सिल ऑफ सायंटिफिक अँण्ड इंडस्ट्रियल रिसर्च, व सचिव, भारत सरकार यांचे व्याख्यान आयोजित केले होते. यासाठी प्रतिष्ठानने रु. १०,०००/- चे अनुदान सदर संस्थेस दिले आहे.

## ७. यशवंतराव चव्हाण शिष्यवृत्ती:

### अ) आदर्श गाव संशोधन प्रकल्प:

टाटा इन्स्टिट्यूट ऑफ सोशल सायन्सचे श्री. सी.व्ही. मधुकर यांचेकडे 'आदर्श गाव संशोधन प्रकल्प' सोपविण्यात आला होता. याबाबत श्री. मधुकर यांनी काही अपरिहार्य कारणास्तव वरील प्रकल्प पूर्ण करू शकत नसल्याचे कळविले आहे.

### ब) महर्षी विठ्ठल रामजी शिंदे: जीवन व कार्य

डॉ. गो.मा.पवार, सोलापूर यांना महर्षी विठ्ठल रामजी शिंदे: जीवन व कार्य या विषयावर प्रकल्प पूर्ण करण्यासाठी प्रतिष्ठानने रुपये ७५,०००/- ची शिष्यवृत्ती मंजूर केलेली होती. सदर प्रकल्प डॉ. पवार यांनी पूर्ण केला असून तो प्रतिष्ठानला सादर केला आहे. त्याबाबतची पुढील कार्यवाही चालू आहे.

### क) महाराष्ट्राच्या औद्योगीकरणाचे सामाजिक आणि सांस्कृतिक परिणाम संशोधन प्रकल्प:

औद्योगिकरणाचे समाजावर, भाषेवर, संस्कृतीवर, लोकांच्या राहणीमानावर काय परिणाम झाले या विषयीचे संशोधन श्री. प्रकाश देशमुख टप्प्याटप्प्याने पूर्ण करणार आहेत. त्याबाबातीत श्री. देशमुख यांच्याशी वेळोवेळी पत्रव्यवहार केला आहे.

### ड) 'साप्ताहिक सकाळ'मधील लेखमाला:

महाराष्ट्रातील समाजकार्य करणाऱ्या स्वयंसेवी संस्थांवर लेखमाला लिहून 'साप्ताहिक सकाळ' वृत्तपत्रात प्रसिद्ध करण्याचा प्रकल्प श्री. आर्टी जोगळेकर, पुणे यांनी प्रतिष्ठानला सादर केला होता. त्यास अनुसरून आतापर्यंत आठ लेख 'साप्ताहिक सकाळ' मध्ये प्रसिद्ध झाले आहेत.

**८. प्रतिष्ठानमार्फत देण्यात आलेल्या देणग्या/अनुदाने:** अहवाल वर्षात खालील संस्थांना देणग्या/अनुदान देण्यात आले.

अ) 'संपर्क' या संस्थेला रु. ३०००/- अनुदनान देण्यात आले.

ब) सत्यशोधक-छत्रपती-ज्ञानदीप पुरस्कारांच्या कार्यक्रमापोटी धुळे येथील 'फुले आंबेडकर तत्वज्ञान संस्था' या संस्थेला रु. ३०,०००/- देणगी देण्यात आली.

क) श्री. जयदेव गायकवाड यांच्या 'संविधान सभेत डॉ. आंबेडकर' या पुस्तक छपाईसाठी रु. २०,०००/-.

ड) सार्वजनिक उत्सव समिती, नवी दिल्ली या संस्थेला 'यशवंतराव चव्हाण स्मृती समारोहा'साठी रु. ३०,०००/-

इ) डॉ. श्रीराम रामजी घोले व डॉ. रघुनाथ विठ्ठल खेडकर यांच्या चरित्रासंबंधीच्य प्रकल्पासाठी श्रीमती अरुणा ढेरे यांना रु. ६३,०००/- चे अनुदान मंजूर करण्यात आले. त्यापैकी रु.४६,०००/- अनुदान यावर्षी अदा करण्यात आले.

ई) युवक बिरादरी मुंबई शाखा यांनी आयोजित केलेल्या कार्यक्रमाप्रीत्यर्थ रु. १९,५००/- चे अनुदान देण्यात आले.

**९. प्रतिष्ठानला मिळालेल्या देणग्या:** मुख्यमंत्री सहाय्यता निधीतून अनुदान.

अ) महाराष्ट्र शासनाने प्रतिष्ठानतर्फे येणाऱ्या विविध कार्यक्रम/उपक्रमासाठी अंशतः सहाय्य म्हणून मुख्यमंत्री सहायता निधीतून रु.५ लाखाचे अर्थसाहाय्य केले. त्याबद्दल महाराष्ट्र शासनाचे प्रतिष्ठान आभारी आहे.

ब) रॉयल वेस्टर्न इंडिया टर्फ क्लब चॅरिटीज् फंड यांचेकडून अपंग व्यक्तीच्या प्रशिक्षणासाठी 'संगणक खरेदीसाठी' रु.७.५ लाख अनुदान मिळाले. त्याबद्दल प्रतिष्ठान त्यांचे आभारी आहे.

## १०. प्रतिष्ठानच्या विभागांमार्फत झालेले कार्यक्रम/उपक्रम:

### अ) कृषी सहकार व्यासपीठ:

कृषी सहकार व्यासपीठाचे काम मुख्यत: पुणे ऑफिसमधून चालते. श्री. ज्ञानेश्वर खैरे, प्रतिष्ठानचे विश्वस्त,निमंत्रक म्हणून काम पाहतात. श्री. मोहन धारिया, कार्याध्यक्ष यांचे व्यासपीठास सक्रिय मार्गदर्शन मिळते. श्री. एस.टी. भिडे, श्री. पी.टी.पडोळ हे सहकार खात्यातील वरिष्ठ निवृत्त अधिकारी दैनंदिन कामकाज पाहतात. वनराई, इंडियन सोसायटी फॉर स्टडीज इन को-ऑपरेशन, को. ऑपरेटिव्ह इनिशिएटिव्ह पॅनल, आनंद(गुजरात) राज्य सहकारी बँक, राज्य सहकारी संघ, वैकुंठभाई मेहता राष्ट्रीयसंस्था, नाबार्ड, सहकार वर्धिनी, सहकार भारती इत्यादी सहकार क्षेत्रात अग्रगण्य असलेल्या संस्थांच्या सहभागाने काम चालते.

१. **सहकार कायदा:**

महाराष्ट्र आत्मनिर्भर सहकारी संस्थांचा कायद्यासंबंधी महाराष्ट्र शासन व राज्यसहकारी बँक यांनी आयोजित केलेल्या चर्चासत्रात प्रतिष्ठानच्या प्रतिनिधींनी भाग घेतला. या चर्चासत्रास प्रतिष्ठानचे अध्यक्ष मा. शरद पवार पूर्णवेळ उपस्थित होते. सदर परिषदेचा समारोप मा. मुख्यमंत्र्यांनी केला. त्यात सध्याच्या अधिनियमातील सुधारणासंबंधी ऊहापोह झाला. सर्व (१२५) सूचनांवर अभ्यास करून शिफारशी करण्यासाठी एक समिती मा. सहकार आयुक्त यांनी नेमली होती. त्यात प्रतिष्ठानचे वतीने श्री. शं.त्रिं. भिडे, निवृत्त सहनिबंधक व इंडियन सोसायटीचे वतीने प्रो. नाडकर्णी यांनी सहभाग घेतला. आत्मनिर्भर व स्वायत्त सहकारी कायद्याचे दुरुस्त प्रारूप सदर समितीने तयार करून ते मा. सहकार आयुक्त यांनी शासनास सादर केले आहे.

२. **अर्थसंकल्पासंबंधी अर्थमंत्र्यांना निवेदन:**

गतवर्षी केंद्रीय अर्थसंकल्पात 'कृषी सहकार' क्षेत्रात काय तरतुदी असाव्यात यासंबंधी चर्चासत्र घेऊन शिफारशी श्री. मोहन धारिया यांच्या स्वाक्षरीने पाठविण्यात आल्या. त्यातील काहींचा समावेश केंद्रीय अंदाजपत्रकात झाला.

३. **रिझर्व्ह बँक अभ्यासगटाकडे निवेदन सादर केले:**

इंडियन सोसायटी फॉर स्टडीज इन को-ऑपरेशन आणि पुणे अर्बन बँक्स् असोसिएशन त्याचप्रमाणे बँक व्यवसायातील तज्ज्ञांच्या बरोबर चर्चा करून बँकींग रेग्युलेशन ॲक्ट व महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० या तीन दुरुस्त्यांबाबत निवेदन सादर केले.

४. **सहकार सप्ताह:**

नेहमीप्रमाणे यावर्षीही सहकार प्रतिष्ठानने एक कार्यक्रम आयोजित केला त्यात मा. पदमविभूषण बाळासाहेब भारदे यांचे 'संत वाङ्मयातील सहकार' यावर भाषण झाले. या भाषणाच्या कॅसेट राज्य संघाने तयार करून सहकारी संस्थांना उपलब्ध केल्या आहेत.

५. **कै. धनंजयराव गाडगीळ जन्मशताब्दी:**

प्रो. गाडगीळ जन्मशताब्दीनिमित्त स्थापन केलेल्या समितीशी प्रतिष्ठानने सहकार्य केले. प्रतिष्ठानच्या वतीने पद्मश्री विखे पाटील प्रवरा संस्थान, पुणे येथे एका चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले.

६. प्रतिष्ठान व वनराई यांचे संयुक्त विद्यमाने पंचायत राज, सहकार, ग्रामीण उद्योग, गांडूळखत उत्पादन इत्यादी पाच चर्चासत्रे आयोजित केली.

७. **बहुराज्यीय सहकारी संस्था विधेयक:**

केंद्र शासनाने याबाबतचे विधेयक लोकसभेत मांडले आहे. त्या विधेयकावर मा.श्री.मोहन धारिया यांचे अध्यक्षतेखाली दि. १९ जानेवारी व २० जानेवारी २००१ रोजी तज्ज्ञांची चर्चासत्रे भरविण्यात आली होती. शिफारशींचा मसुदा तयार करून आनंद (गुजरात) जाहिरनामा प्रस्तावाचे अनुषंगाने सविस्तर चर्चा होऊन शिफारशींचा मसुदा सर्वांकडे पाठविण्यात आला.

८. **ग्रामीण पतपुरवठा सर्वेक्षण:**

राष्ट्रीय कृषी व ग्रामीण विकास बँकने ग्रामीण पतपुरवठ्याचा अभ्यास करण्यासाठी भारत सरकार व रिझर्व्ह बँक यांच्याशी सल्लामसलत करून एक तज्ञ समिती नेमली असून सदर तज्ञ समितीने अभ्यास करून आपल्या

शिफारशी सादर करावयाच्या आहेत. या तज्ञ समितीने तयार केलेल्या प्रश्नावलीचे मराठी भाषांतर करून जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका, राज्य सहकारी संघ, सहकारी साखर कारखाने यांचे सहकार्याने प्रातिनिधीक प्राथमिक कृषी पतसंस्थांची माहिती प्रश्नावलीतून गोळा करण्यात आली असून त्या माहितीचे आधारे एक सविस्तर निवेदन प्रतिष्ठानमार्फत तज्ञ समितीस सादर करण्यात आले.

ब) **महाराष्ट्र महिला व्यासपीठ:** महाराष्ट्र महिला व्यासपीठाचे कार्यक्रम श्रीमती शारदा साठे, संयोजिका यांच्या मार्गदर्शनाखाली संपन्न झाले.

१. चेंबूर येथे २६ एप्रिल २००० रोजी महिला मेळावा व हळदी-कुंकू कार्यक्रम सौ. संगीता हंडोरे व माजी महापौर चंद्रकांत हंडोरे यांच्या संयुक्त विद्यमाने संपन्न झाला. त्यामध्ये १००० महिलांनी भाग घेतला

२. दि. २७ व २८ एप्रिल २००० रोजी रंगशारदा सभागृह, वांद्रे येथे विधी साक्षरता कार्यक्रम झाला. या कार्यक्रमाला अंदाजे ४०० व्यक्ती उपस्थित होत्या.

३. दि. ३० जून रोजी महिलांचा मेळावा आयोजित केला होता. या कार्यक्रमात समस्याग्रस्त व्यक्तींनी आपल्याला आलेले अनुभव मांडले. श्री. अरविंद पाटील यांनी संजय गांधी निराधार योजना व दुसऱ्या काही योजनांसंदर्भात माहिती दिली. या कार्यक्रमांत ७५ व्यक्तींनी सहभाग केला.

४. दि. १४ ऑगस्ट रोजी रात्री स्वातंत्र्यदिनाच्या पूर्वसंध्येला नवभारत युवा आंदोलन व महाराष्ट्र महिला व्यासपीठतर्फे फेरीचे आयोजन केले होते.

५. १७ ऑगस्ट रोजी गायन, नाटक व कविता वाचन इत्यादीचा सांस्कृतिक कार्यक्रम चव्हाण सेंटरच्या सभागृहात आयोजित केला होता.

६. १९.८.२००० रोजी महिला कल्याण शिक्षण संस्थेतर्फे नाडकर्णी केंद्र, वडाळा येथे औद्योगिक शिबीर झाले. सदर शिबिराला ६०० महिला उपस्थित होत्या.

७. दि. ८.९.२००० रोजी महाराष्ट्र शासन व 'साहस' यांच्या विद्यमाने आयोजित आंतरराष्ट्रीय साक्षरता दिन कार्यक्रम झाला. त्यांत १००० महिला सहभागी झाल्या.

८. २४.९.२००० रोजी 'अपनालय'तर्फे ३० कार्यकर्त्यांचे शिबिर झाले. श्रीमती शोभा लोंढे यांनी बचतगट स्थापन करून महिलांनी आर्थिक बाजू बळकट करण्याचा प्रयत्न करावा, याबाबत मार्गदर्शन केले.

९. दि. १५ नोव्हेंबर २००० पुणे येथील 'गणेश क्रीडा महोत्सव हॉल' येथे 'जागतिक स्त्री जागरण अभियान २०००' हा कार्यक्रम झाला. हिंसाचार विरोधात ही परिषद होती. जागतिकीकरणाचा परिणाम, सार्वजनिक उद्योगांचे खाजगीकरण व नवीन तंत्रज्ञानामुळे स्त्रियांची बेरोजगारी वाढत आहे. दलित आदिवासी, अल्पसंख्याक स्त्रियांवर जागतिकीकरणाचा विशेष वाईट परिणाम होत आहे. यासंबंधीची चर्चा झाली. तेथे १००० महिला उपस्थित होत्या.

१०. मुलुंड कार्यालयात २० महिलांची बैठक झाली. व्यासपीठातील 'रोशनी' केंद्रातील समस्या निवारण संदर्भात बरीच माहिती श्रीमती मंगला शिंदे यांनी दिली. श्रीमती आदिती स्वामकर यांनी प्रस्तावना केली. श्रीमती शोभा लोंढे यांनी सूत्रसंचालन केले.

११. ३ जानेवारी २००१ रोजी सावित्रीबाई फुले जयंतीनिमित्त महाराष्ट्र राज्य महिला आयोगाने राज्यस्तरीय महिला मेळावा घेतला. या मेळाव्यात महिला व्यासपीठाच्या कार्यकर्त्या सहभागी झाल्या होत्या. या कार्यक्रमांत माविम व महिला बालविकास विभाग यांनी सहकार्य केले होते. या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री मा. ना. विलासराव देशमुख उपस्थित होते.

१२. ६ जानेवारी २००१ रोजी महाराष्ट्र महिला व्यासपीठतर्फे 'स्त्रीहक्क अभियान' यांचे तिसरे चर्चासत्र कोल्हापूर येथील 'जयलक्ष्मी सांस्कृतिक हॉल' येथे पार पडले. येथे ६०० महिलांची उपस्थिती होत्या. त्यामध्ये महाराष्ट्र महिला व्यासपीठाच्या कार्यकर्त्यांनी मार्गदर्शन केले.

१३. महिला आपल्या समस्या घेऊन पोलीस स्टेशन गेल्यावर पोलीस योग्यरीत्या दखल घेत नाहीत. यासंदर्भात

दि. २२ जानेवारी २००१ रोजी चर्चासत्र आयोजित केले होते. या चर्चासत्रात महिला आयोगाच्या अध्यक्षा श्रीमती निर्मला सामंत-प्रभावळकर, श्रीमती सुधाताई कुलकर्णी, श्रीमती गोयल, श्रीमती शारदा साठे व श्रीमती ज्योती म्हापसेकर तसेच पोलीस अधिकारी व अन्य प्रमुख व्यक्ती हजर होत्या.

१४. महिलांचा बचतगट व महिलांसाठी असणाऱ्या विविध योजनांच्या माहितीसाठी श्रीमती शालिनी गायकवाड यांनी यशवंतराव चव्हाण केंद्राच्या सभागृहात दि. २८ जानेवारी २००१ रोजी कार्यक्रम आयोजित केला. यात बचतगटाची संपूर्ण माहिती शोभा लोंढे यांनी दिली. महिलांच्या विविध योजनांची माहिती व महिलांनी एकजुटीने काम करून सक्षम होण्यावर आपले विचार श्रीमती वासंती शेवाळे यांनी व्यक्त केले. या कार्यक्रमात १५० महिला उपस्थित होत्या. २९ जानेवारी २००१ रोजी आदिवासी गावात जमीन, पाणी याविषयी काय समस्या आहेत?, तेथील स्त्रियांची काय परिस्थिती आहे? समस्या कशाप्रकारे असतात? कशा हाताळल्या जातात? हे पाहण्यासाठी महाराष्ट्र महिला व्यासपीठ व नवभारत युवा आंदोलनाचे कार्यकर्ते दोन दिवसांच्या दौऱ्यावर पनवेल, तारा, रोणवई, मुकेळी व नागोटणे येथे गेले होते.

१५. दि. ३१ जानेवारी २००१ रोजी केशवपाडा, मुलुंड येथे महाराष्ट्र महिला व्यासपीठाच्या कार्यकर्त्या रतन गौडांवे यांनी तिळगुळ समारंभ कार्यक्रम आयोजित केला.

१६. दि. २ फेब्रुवारी २००१ रोजी बोरवली, आंबेवाडी येथे 'आशावलय महिला मंडळ' तर्फे जाहीर प्रशिक्षण मार्गदर्शन कार्यक्रम झाला. विविध विषयांवर महाराष्ट्र महिला व्यासपीठाच्या कार्यकर्त्यांनी मार्गदर्शन केले.

१७. दि. ८ फेब्रुवारी २००१ रोजी महिला व्यासपीठ व स्त्री-मुक्ती संघटना यांच्या संयुक्त विद्यमाने मुस्लीम महिलांविषयी कायदे, न्यायालयीन कामकाज, इस्लामधर्म याविषयी शिबीर आयोजित केले होते. या कार्यक्रमात ३० महिलांनी सहभाग घेतला.

१८. दि. १० फेब्रुवारी २००१ रोजी मुलुंड धरम बिल्डिंग येथील कार्यालयात 'संघटनात्मक बांधणी' या विषयी चर्चासत्र झाले. या चर्चेत मुंबई विभाग व बाहेरगावाहून आलेल्या ६० महिलांनी भाग घेतला. या बैठकीत पुढील वर्षाकरीता घ्यावयाचे कार्यक्रम ठरविण्यात आले.

१९. दि. २८.२.२००१ रोजी के. मा. श्री. दादासाहेब रूपवते यांच्या ७६ व्या जन्मदिनानिमित्त 'धम्मयात्रा' आयोजित केली. या कार्यक्रमात स्थानिक १००० कार्यकर्त्यांनी सहभाग घेतला. हा कार्यक्रम दादासाहेब रूपवते स्मृति स्मारक, भंडारदरा, ता. अकोले, जि-अहमदनगर येथे झाला. त्यामध्ये व्यासपीठाच्या कार्यकर्त्यांनी सहभाग घेतला.

२०. ८ मार्च २००१ आंतरराष्ट्रीय महिलादिनानिमित्त बोरीवली-पूर्व येथे आयोजिण्यात आलेल्या कार्यक्रमात श्रीमती वासंती शेवाळे, श्रीमती अर्चना नाईक, श्रीमती मंगला शिंदे, श्रीमती दिपाली परब इत्यादी कार्यकर्त्यांनी सहभाग घेतला. आशा आधार मंच यांच्या वतीनेही महिला दिनानिमित्त डॉ. आंबेडकर सदनाजवळ, करी रोड-पश्चिम, मुंबई - १३ येथे कार्यक्रम झाला. त्यामध्ये श्रीमती रेखा नार्वेकर यांनी भाग घेतला.

**क) नवभारत युवा आंदोलन:** प्रतिष्ठानचा हा विभाग श्री. प्रेमानंद रूपवते संयोजक यांचे मार्गदर्शनाखाली कार्यरत असून श्री. दत्ता बाळसराफ संघटक म्हणून त्यांना सहाय्य करतात. या विभागामार्फत खालील कार्यक्रम करण्यांत आले.

१. **यशवंतराव चव्हाण स्मृति महाविद्यालयीन गुणगौरव चषक स्पर्धा:** सलगपणे सातव्या वर्षी महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी विद्यापीठ स्तरावर निबंध व वक्तृत्व स्पर्धा, मुंबई विद्यापीठ, पुणे विद्यापीठ, शिवाजी विद्यापीठ व उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ अंतर्गत वैशिष्ट्यपूर्ण रीतीने आयोजित करण्यात आल्या. सहसंयोजक म्हणून पुणे विभागीय केंद्र, फलटण युथ फौंडेशन फलटण, उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगांव या संस्थांचे सहकार्य लाभले. यशस्वी स्पर्धकांना सन्मानचिन्हे, प्रमाणपत्र व रोख रक्कमेच्या स्वरूपात पारितोषिके देण्यात आली.

२. **पर्यावरण स्वयंसेवक प्रशिक्षण कार्यशाळा:** मुंबई येथे दोन दिवसांची पर्यावरण स्वयंसेवक प्रशिक्षण कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. कार्यशाळेत ३० प्रशिक्षणार्थींनी सहभाग घेतला. त्याचप्रमाणे युथ हॉस्टेल ऑफ इंडिया यांचे सहकार्याने युसुफ मेहेरअली सेंटर, तारा येथे सामाजिक व स्वयंसेवी संस्थांच्या कार्यकर्त्यांसाठी दोन दिवसांची 'पर्यावरण संरक्षण व संवर्धन कार्यशाळा' घेण्यात आली. त्यामध्ये ३० कार्यकर्त्यांनी सहभाग घेतला.

३. **समाज कार्यकर्ता प्रशिक्षण वर्ग:** सामाजिक कार्याची आवड असणाऱ्या स्त्री-पुरुषांकरीता समाज कार्यकर्ता प्रशिक्षणवर्गाचे सहा महिने आयोजन करण्यात आले. २० प्रशिक्षणार्थींनी भाग घेतला. प्रशिक्षणवर्गात विविध क्षेत्रातील तज्ज्ञांनी मार्गदर्शन केले. प्रशिक्षणार्थींकरीता प्रकल्प भेट, युसुफ मेहेरअली सेंटर, तारा व सर्वहारा जनआंदोलन, रोहा आदिवासी बांधवांकरीता काम करणाऱ्या संघटनेसह आयोजित करण्यात आली.

४. **एड्स प्रतिबंधक प्रशिक्षण नेतृत्त्व कार्यशाळा:** मुंबई येथे दोन एड्स प्रतिबंधक प्रशिक्षण नेतृत्त्व कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. या दोन्ही कार्यशाळेत ७५ प्रशिक्षणार्थींनी भाग घेतला. त्यापैकी एक कार्यशाळा चव्हाण सेंटर येथे घेण्यात आली.

५. **स्वातंत्र्यदिन रात्र फेरी:** दि. १४ ऑगस्टच्या रात्री भारतीय स्वातंत्र्यदिनानिमित्ताने कार्यकर्त्यांची रात्रफेरी काढण्यात आली. फेरीमध्ये राष्ट्रीय स्मारकांना भेटी, कार्यकर्त्यांची भाषणे, संविधान, प्रतिज्ञा, राष्ट्रगीत घेण्यात आले.

६. **पत्रकारिता शिबीर:** चव्हाण सेंटर येथे एक दिवसाचे पत्रकारिता शिबीर आयोजित करण्यात आले होते. या कार्यक्रमांत ३० कार्यकर्त्यांनी सहभाग घेतला.

७. **चर्चासत्र, बैठका:** रेशनिंग प्रश्नांवर जिल्हावार बैठका आयोजित करण्यात आल्या होत्या. त्याचप्रमाणे मुंबईमध्ये रेशनबचाव परिषद आयोजित करण्यात आली होती. रेशन भाववाढ व धोरण या विषयावर कार्यशाळेचे आयोजन केले होते.

- मराठवाडा विभागात युवा कार्यकर्ता शिबिरे आयोजित करण्याबाबत मराठवाड्यातील कार्यकर्त्यांसोबत चव्हाण सेंटर येथे बैठक घेण्यात आली.
- परभणी व नाशिकमध्ये अपंगामध्ये काम करणाऱ्या संस्थांच्या प्रतिनिधींसोबत चव्हाण सेंटर येथे बैठक घेण्यात आली. आजची राजकीय, सामाजिक परिस्थिती या विषयांवर श्री. ठकुरदास बंग यांचे सोबत बैठका घेण्यात आल्या.

## इतर कार्यक्रम:

- दि. ६ डिसेंबर २००० रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर महापरिनिर्वाणदिनानिमित्त मुंबईत सभेचे आयोजन करण्यात आले होते. नवभारत युवा आंदोलनाच्या वतीने सहभाग घेण्यात आला.
- नवभारत युवा आंदोलन व 'कल्याणकारी राज्य समर्थन समिती' यांचे वतीने महाराष्ट्रातील कार्यकर्त्यांसाठी एक दिवसाच्या बैठकीचे आयोजन.
- ग्रंथोत्सव २००० च्या कार्यक्रमास सहकार्य.
- महिला व्यासपीठाच्या वतीने कोल्हापूर येथे आयोजित महिला मेळावा, दत्ता बाळसराफ वक्ते म्हणून उपस्थित होते.
- युवा व्यक्तिमत्व विकास शिबीर, नंदुरबार येथे दत्ता बाळसराफ व्यक्ते म्हणून प्रतिष्ठानच्या वतीने उपस्थित हाते.
- नाशिक येथील 'संगिनी जागृती महिला मंडळाच्या' सहकार्याने युवक-युवती जागृती शिबीर घेण्यात आले. ५२ शिबिरार्थींनी सहभाग घेतला.
- उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, युवक महोत्सव,, नवापूर, जि-धुळे येथे प्रतिष्ठानच्या वतीने उपस्थिती.
- प्रतिष्ठानचे उपाध्यक्ष दिवंगत दादासाहेब रूपवते यांच्या जयंतीच्यानिमित्ताने कार्यक्रम भंडारदरा, ता. अकोले, जि.अहमदनगर येथे प्रतिष्ठानच्या वतीने दत्ता बाळसराफ, विद्याधर खंडे, मिलिंद कांबळे उपस्थित होते.
- नवभारत युवा आंदोलनाच्या वतीने 'गरीब व गरिबीच्या न्याय्य व्याख्या' या विषयावर एक दिवसाच्या चर्चासत्राचे आयोजन, सहभाग ७० ते ८० कार्यकर्ते.
- रंगस्वरच्या सहकार्याने दि. २६ जानेवारी रोजी चव्हाण सेंटर येथे भारतीय प्रजासत्ताकदिनानिमित्त कुलाब्यातील शाळेतील विद्यार्थ्यांचा 'एक सूर एक ताल' कार्यक्रम करण्यात आला. यात ५०० विद्यार्थ्यांनी भाग घेतला.

**ड) मोफत कायदेविषयक सहाय्य व सल्ला फोरम:**

१. **मोफत कायदेविषयक सल्ला केंद्र:** महिन्याच्या प्रत्येक शुक्रवारी सायंकाळी ५.३० ते ७.३० या वेळात कायदेविषयक सल्ला देण्याकरीता केंद्र सुरू असते. या केंद्रामार्फत नामवंत वकील उपस्थित राहून गरजू लोकांना तोंडी सल्ला देत असतात. वर्षभरात १०० पेक्षा जास्त लोकांनी या केंद्राचा लाभ घेतला.

२. **कायद्याची ओळख:** विविध कायद्यांची ओळख सामान्य जनतेला, होतकरू वकिलांना आणि अभ्यासकांना करून देण्यासाठी कायदेविषयक फोरमने कायद्याची ओळख या व्याख्यानमालेचे आयोजन केले होते. यामध्ये व्याख्याते म्हणून राज्यातील तज्ञ, न्यायाधीश, आणि माजी न्यायाधीश यांची व्याख्याने आयोजित करण्यात येतात. अशाप्रकारच्या अनेक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. यावर्षी न्या.डी.आर.धनुका यांचे 'इच्छा मरण' या विषयावर व्याख्यान झाले. न्या. एम. राधाकृष्णन् यांचे 'आधुनिक समाजातील मानवीहक्क' यावर व्याख्यान झाले.

३. **पौगंडावस्थेतील मुलींची व्यक्तिमत्व विकास शिबिरे:** इयत्ता ८ वी ते इयत्ता १२ वीच्या मुलींकरीता या शिबिराचे आयोजन करण्यात येत असते. यामध्ये भारतीय राज्यघटना, विवाह कायदा, पोटगीचा कायदा, जीवनमूल्ये याविषयावर चर्चा स्वरूपात व्याख्याने दिली जातात. यावर्षी मुंबई परिसरातील अनेक शाळांमध्ये एक दिवसाच्या या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. अशी शिबिरे पुढील ठिकाणी घेण्यात आली. 'माने गुरूजी आरोग्य मंदिर, चुनाभट्टी', 'मस्वी शेजारी महिला मंडळ, ठाणे' व 'पेन एज्युकेशन सोसायटी कॉलेज, पेण'.

४. **ज्येष्ठ नागरिकांची कार्यशाळा:** ज्येष्ठ नागरिकांच्या अनेक कार्यशाळांचे आयोजन मुंबई, नवी मुंबई, ठाणे जिल्हा या ठिकाणी करण्यात आले होते. यामध्ये ज्येष्ठ नागरिकांच्या संघांचे सहकार्य मिळत असते. या कार्यशाळांमध्ये ग्राहक संरक्षण कायदा, प्रॉपर्टीचा कायदा, इच्छापत्र, गुंतवणूक आणि सामाजिक/घरगुती प्रश्न या विषयावर चर्चा केली जाते. अशा कार्यशाळा पुढील ठिकाणी घेण्यात आल्या.

१. रोटरी कम्युनिटी सेंटर, रोटरी गार्डन, डोंबिवली
२. व्हॉलंटरी एक्झुक्युटीव्ह फोरम ऑफ इंडिया, वाशी

५. **महिलांची कार्यशाळा:** महिला कार्यकर्त्यांना कायद्याच्या माहितीद्वारे सक्षम बनविण्याकरता यशवंतराव चव्हाण लिगल फोरमने महिलांकरिता मुंबईत आणि मुंबईबाहेर अनेक कार्यशाळा आयोजित केल्या. यामध्ये महिलासंबंधी कायद्याची व्याख्याने घेण्यात येतात.पुढील ठिकाणी यावर्षी महिलांची कार्यशाळा आयोजित करण्यात आलेली होती.सार्वजनिक मित्रमंडळ,उल्हासनगर

६. **कायदेविषयक कार्यशाळा:** एक विशेष कायदेविषयक कार्यशाळा फूटपाथवासियांकरीता रोझरी चर्च,माझगांव येथे आयोजित केली होती. या कार्यशाळेत मुस्लीम समाजातील बहुसंख्य स्त्री-पुरूष उपस्थित होते. त्याचबरोबर झोपडपट्टीवासियांकरीता धारावी येथे कायदेविषयक कार्यशाळा आयोजित केली होती या कार्यशाळेकरीता मुस्लिम,ख्रिश्चन,हिंदु,शिख या धर्मातील २०० ते २५० लोक उपस्थित होते.

७. **परिसंवाद:** मूलभूत कर्तव्ये याविषयावर श्री.सदाशिवराव तिनईकर, माजी महानगरपालिका आयुक्त यांच्या अध्यक्षतेखाली चव्हाण सेंटरमध्ये परिसंवाद आयोजित करण्यात आला.

'लिगल सर्व्हिसेस ॲथॉरिटी ॲक्ट १९८७' या विषयावर मुंबई विद्यापीठात परिसंवाद आयोजित करण्यात आला होता. यावेळी न्या.श्रीकृष्ण अध्यक्षस्थानी होते. जवळजवळ ५०० विद्यार्थी या परिसंवादाला उपस्थित होते. 'माहितीचा अधिकार' याविषयावर पुणे येथे परिसंवाद आयोजित करण्यात आला होता या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी समाजसेवक श्री अण्णा हजारे होते.

कायदेविषयक व्यावसायिक.वैधर्कीय नीतीमूल्ये याविषयावर मुंबई विद्यापीठात परिसंवाद आयोजित केला होता या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी श्री. भालचंद्र मुणगेकर, कुलगुरू, मुंबई विद्यापीठ उपस्थित होते.

**ढ) रंगस्वर-सांस्कृतिक विभागामार्फत करण्यात आलेले कार्यक्रम:**

प्रतिष्ठानच्या रंगस्वरतर्फे नाट्य, चित्रपट, गायन आदि कार्यक्रम होतात. वार्षिक वर्गणी रुपये. ५००/- व पती-पत्नीसाठी रुपये ६००/- भरून रंगस्वरचे सभासद होता येते. रंगस्वरच्या सदस्यांना तसेच प्रतिष्ठानच्या आजीव

सदस्यांनाही सवलतीच्या दरात वरील कार्यक्रमांचा आस्वाद घेता येतो. सांस्कृतिक विभागासाठी डॉ. रवि बापट, विश्वस्त यांच्या मार्गदर्शनाखाली सल्लागार समिती व संघटन समिती असून त्यांच्यामार्फत कार्यक्रमाचे नियोजन करण्यात येते. यावर्षामध्ये रंगस्वरच्या काही महत्वाच्या कार्यक्रमांचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

चिल्ड्रेन्स फिल्म सोसायटीतर्फे दर रविवारी छोट्या-मोठ्या मुलांसाठी फिल्म्स् दाखविण्यात आल्या. भीमसेन जोशी अध्यासनातर्फे दर महिन्याला दोन नवीन कलाकारांची गायनाच्या अथवा वादनाच्या माध्यमातून ओळख करून देण्यात आली. दर गुरूवारी नॅशनल फिल्म डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन (एनएफडीसी)तर्फे विविध भाषेतील फिल्म दाखविण्यात आल्या. मे २००० मध्ये पुण्याच्या 'वलय' या संस्थेचे 'माणूसपण' हे हौशी कलाकाराचे नाटक व अरुण खोपकर यांचे दोन लघुपट दाखविले. तसेच नीना मेहता, राजेंद्र मेहता यांच्या गझलांचा कार्यक्रम, 'अश्वत्थ', पुणे यांचेतर्फे 'सहा बोटांचे तळहात' व आविष्कारतर्फे 'गोष्ट लग्नाचीच पण..' हे कार्यक्रम दाखविण्यात आले. तसेच मास्टर दीनानाथ मंगेशकर शताब्दी वर्षानिमित्त रंगशारदा प्रतिष्ठाननिर्मित 'संगीत मानापमान' या नाटकाचा प्रयोग सादर करण्यात आला. 'साहित्य, संस्कृति आणि गणपती' या विषयावरील परिसंवादात प्रा.गंगाधर गाडगीळ, प्रा. शंकर वैद्य, श्रीमती वसुंधरा पेंडसे-नाईक, श्री. मधु मंगेश कर्णिक आणि डॉ. सुरेश नाडकर्णी यांनी भाग घेतला.

जुलै २००० मध्ये पं. जगदीश प्रसाद यांचे गायन, रेखा नार्वेकर यांच्या सूत्रसंचालनाखाली आषाढी एकादशीनिमित्त भक्तिगीतांचा कार्यक्रम, 'सुंदर ते ध्यान' व गणेशोत्सवानिमित्त 'गणराज रंगी नाचतो' हे कार्यक्रम झाले. पु.ल. देशपांडे यांना भावपूर्ण श्रध्दांजली दि. १२ जुलै २००० रोजी वाहण्यात आली, त्यामध्ये कलापिनी कोमकली, पंडीत राहुल देशपांडे व मंजिरी असनारे-केळकर या कलाकारांनी भाग घेतला. प्रभात चित्र मंडळाच्या सहकार्याने सत्यजित रॉय यांच्या 'पाथेर पांचाली', 'अपराजिता' 'अपुर संसार' या चित्रपटांचा महोत्सव भरविण्यात आला. दि. नॉर्थ कॅनरा जी.एस.बी.को.ऑप.बँकेतर्फे पु.ल.देशपांडे व कुसुमाग्रज यांच्या फिल्म्स् दादर-माटुंगा कल्चरल सेंटरमध्ये दाखविण्यात आल्या. दरवर्षीप्रमाणे दिवाळीनिमित्त सकाळी ७.०० वाजता 'सूरप्रभात' हा कार्यक्रम सादर करण्यात आला. इंदौरच्या महिला मंडळातर्फे 'पुलकीता' हा कार्यक्रम, तसेच शोभा मुद्गल, पद्मा तळवलकर, पं. ब्रिजनारायण, उस्ताद आलमखान या कलाकारांचे 'दिलरंग अकादमी ऑफ म्युझिक अ‍ॅण्ड फाईन आर्टस्' या संस्थेबरोबर शास्त्रीय गायनांचा कार्यक्रम, ग्रंथोत्सव २००० निमित्त सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करण्यात आले. 'मुंबई अ‍ॅकेडमी ऑफ मुव्हींग इमेज', प्रभात चित्र मंडळ यांच्या सहकार्याने विविध भाषांमधील आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव आयोजित करण्यांत आले. रोज पांच चित्रपट दाखविण्यात आले. बी.आर.देवधर जन्मशताब्दीनिमित्त देवधर शाळेच्या अमृत महोत्सवानिमित्त गायनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. 'जाऊ बाई जोरात', 'डुंगाजी हाऊस', 'बुद्धीबळ', 'झब्बु', 'राधा वजा रानडे' इत्यादी नाटके सादर केली.

शुभम् प्रॉडक्शन बंगलोरचे 'चित्रपट' हे हिंदी नाटक दाखविण्यात आले. कुसुमाग्रजांच्या स्मृतिदिनानिमित्त 'प्रवासीपक्षी' व 'पु.ल.वृत्तांत' हे अनुबोधपट दाखविण्यात आले. तिबेटन यूथ कॉंग्रेसतर्फे फ्रेंडस् ऑफ तिबेट सांस्कृतिक महोत्सव १३ मार्च ते १७ मार्च २००० या काळात भरविण्यात आला. उस्ताद 'झियाउद्दीन डागर मेमोरियल ट्रस्ट'तर्फे तबलानवाज 'उस्ताद अल्लारखाँ' यांच्या फोटोंचे प्रदर्शन भरविण्यात आले. फिल्म डिव्हिजन तर्फे उस्ताद अल्लारखा यांच्या जीवनावर आधारित अनुबोधपट दाखविण्यात आला. रामदास फुटाणे व फ.मु.शिंदे, विठ्ठल वाघ, अरुण म्हात्रे, महेश केळूसकर, अशोक नायगावकर, नलेश पाटील यांच्या सहकार्याने केलेल्या 'हास्यधारा' या कार्यक्रमाने या वर्षाची सांगता झाली.

## ११. प्रतिष्ठानची नवी प्रकाशने:

अ) मा.श्री.राम प्रधान,विश्वस्त यांनी संपादीत केलेली **मा.चव्हाणसाहेबांची संसदेतील भाषणे खंड ३ व ४** मेसर्स. अमेय प्रकाशन, पुणे यांनी छापली असून सदर ग्रंथाचे प्रकाशन मा.चव्हाणसाहेबांच्या पुण्यतिथीदिनी संपन्न झाले. मा.चव्हाणसाहेबांची संसदेतील भाषणे मालिकेचे १ते४ खंड एकत्रित करून सदर ग्रंथांच्याप्रती संसद व सर्व राज्यातील विधानमंडळांच्या ग्रंथालयांना भेट म्हणून पाठविण्यात आल्या.

ब) मा.चव्हाणसाहेबांची सभा-संमेलनांमध्ये झालेली भाषणे तसेच वर्तमानपत्रामध्ये प्रसिध्द झालेले लेख यांचे एकत्रित परिशिलन करून प्रतिष्ठानचे विश्वस्त मा. राम प्रधान यांनी संपादित केलेला **'शब्दांचे सामर्थ्य'** हा ग्रंथ प्रतिष्ठानच्या वतीने कराड येथे २५ नोव्हेंबर २००० या दिवशी प्रकाशित करण्यात आला.

**क)** प्रतिष्ठान व महाराष्ट्र आर्थिक विकास मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने **'महाराष्ट्राची चार दशकांतील वाटचाल : एक आढावा'** या पुस्तकाचे प्रकाशन २५ नोव्हेंबर २००० रोजी करण्यात आले.

## १२. प्रतिष्ठानची विभागीय केंद्रे:

**अ) सेंटर फॉर इंटरनॅशनल ट्रेड इन ॲग्रीकल्चर ॲण्ड ॲग्रोबेस्ड इंडस्ट्रिज् (Cita) नवी दिल्ली:** विश्वस्त मंडळाच्या दि. १२ मार्च २००१ रोजी झालेल्या सभेत ठरल्याप्रमाणे भारतीय तसेच विकसनशील देशातील शेतीमाल उत्पादकांच्या हिताचे संरक्षण व्हावे म्हणून राष्ट्रीय पातळीवर नवी दिल्ली येथे 'सेंटर फॉर इंटरनॅशनल ट्रेड इन ॲग्रीकल्चर ॲण्ड ॲग्रोबेस्ड इंडस्ट्रिज् (Cita)' या नावाने प्रतिष्ठानने संशोधन व माहिती केंद्र सुरु केले आहे. सदर संशोधन केंद्राचे काम जोमाने व व्यावसायिक कार्यक्षमतेने दिल्ली येथे सुरु झालेले आहे. या केंद्रासाठी देशातील नामांकित वित्तीय संस्थांचे सहकार्य घेण्यात येत असुन मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून या क्षेत्रातील तज्ञ श्री. विनय सारडाणा यांची नेमणूक केलेली आहे. या संशोधन केंद्राचे काम प्रतिष्ठानचे अध्यक्ष मा.श्री.शरदराव पवार यांच्या मार्गदर्शनाखाली नेमलेल्या समितीमार्फत चालू आहे.

**ब) कराड केंद्र:**

**अ)** शिवाजी विद्यापीठाच्या ग्रंथालय प्रमाणपत्र अभ्यासवर्गाच्या दुसऱ्या सत्राचा सप्टेंबर २००० ते नोव्हेंबर २००० चा निकाल ९८ टक्के लागून त्यातील पहिल्या तीन विद्यार्थ्यांत कराडचेच तीन विद्यार्थी विद्यापीठाच्या सर्व केंद्रात उत्तीर्ण झाले.

**ब)** यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानच्या आर्थिक सहकार्याने सौ. वेणूताई चव्हाण स्मारक संशोधन ग्रंथालय, कराड या ग्रंथालयास उत्तमोत्तम संदर्भ व मौलिक ग्रंथ खरेदी करता आले व संशोधक अभ्यासकांची सोय करणे सुलभ झाले. यावर्षी दोन पी.एच.डीचे व एक एम.फील असे तीन संशोधक स्व.चव्हाणसाहेबांचेवर संशोधन करीत आहेत.

याशिवाय ग्रंथालयीन अभ्यासक्रमातील विद्यार्थ्यांना व इतर विषयांचे संशोधन करणाऱ्या संशोधकांना या ग्रंथाचा मोठा फायदा होत आहे.

**क)** 'शब्दांचे सामर्थ्य' या ग्रंथाचा प्रकाशन समारंभ मा.मुख्यमंत्री, ना. विलासराव देशमुख, मा. शरदरावजी पवार, मा. राम प्रधान यांचे उपस्थितीत संपन्न झाला. त्याचदिवशी सौ. वेणूताई चव्हाण स्मारक या संस्थेची सभा मा. शरदरावजी पवार यांचे अध्यक्षतेखाली संपन्न झाली. सदर दिवशी स्व. चव्हाणसाहेब यांच्या व त्यांचेवर इतरांनी लिहिलेल्या ग्रंथांचे 'ग्रंथप्रदर्शन' भरविलेले होते.

**ड)** सौ. वेणूताई चव्हाण स्मारक संशोधन ग्रंथालय व वस्तुसंग्रहालयास तसेच 'विरंगुळा' येथील प्रतिष्ठानच्या कराड केंद्राला पुढील मान्यवरांनी भेटी दिल्या. मा. मोहन धारिया, पुणे, गायिका-सौ. आशा खाडिलकर, मुंबई, मे.ज.डी.एल.गुंजीकर-जएक्स विंग इन्फंट्री स्कूल, बेळगांव, कमांडर, मराठा लाइट इन्फन्ट्री सेंटर, बेळगांव, प्राचार्य मा. व्य. जोशी, तळोदे, जि-नंदुरबार, आंतरराष्ट्रीय कृषीतज्ञ मोहन शंकर देशपांडे, आजरा, जि-कोल्हापूर, श्री.मल्हार अरणकल्ले-संपादक, कोल्हापूर 'सकाळ', मा. जे.एल.पवार, अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायाधीश, नांदेड, न्यायमूर्ति नरेंद्र चपळगांवकर, औरंगाबाद खंडपीठ.
कराड विभागीय केंद्र महिला मंचतर्फे खालील कार्यक्रम संपन्न झाले.

- दि. २५.८.२००० रोजी बाल विवाह प्रतिबंधक पंधरवडा अंतर्गत डी.के.टी इंडिया, मुंबई यांची 'अवघाची संसार' ही एक तासाची लघुनाटिका कासेगा ता. वाळवा. जि-सांगली येथे सादर केली.
- दि. १६.१२.२००० रोजी जोग्याचे टेक ता. पाटण येथे आरोग्यविषयक तपासणी, रोगनिदान व औषधोपचार शिबीर व व्यसनमुक्ती, अंधश्रद्धा व एड्सवर आधारित सांस्कृतिक कार्यक्रम.
- आंतरराष्ट्रीय जागतिक महिला दिन ८ मार्च २००१ रोजी सौ. वेणूताई स्मारक भवन, कराड येथे झाला. प्रा. राजेंद्र कुंभार, हे प्रमुख वक्ते होते.
- मांलसपूर येथे दि. २३ मार्च २००१ रोजी प्रौढ निरंतर शिक्षण व विस्तार कार्य विभाग, शिवाजी विद्यापीठ, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान विभागीय केंद्र कराड तर्फे महिलांचे 'सबलीकरण: महत्व व उपक्रम' या विषयावर चर्चा सत्र संपन्न झाले.




ॲड. सत्यरंजन धर्माधिकारी, अध्यक्ष
मोफत कायदे विषयक
सहाय्य व सल्ला फोरम हे
उपस्थिताना मार्गदर्शन करताना




नवभारत युवा आंदोलन व
पुणे विभागीय केन्द्र आयोजित
पुणे विद्यापीठ अंतर्गत निबंध व वक्तृव स्पर्धांचे
पारितोषिक वितरण समारंभात
मा. ज्ञानेश्वर खैरे, संयोजक प्रेमानंद रुपवते.



महाराष्ट्र महिला व्यासपीठ
स्त्री हक्क अभियान प्रसंगी मार्गदर्शन करताना
संयोजिका श्रीमती शारदा साठे.

## क्षण




मा. ना. धो. महानोर यांच्या सत्कार प्रसंगी मा. शरदराव पवार, श्रीमती विजया राजाध्यक्ष, व सौ. महानोर




मा. ना. धो. महानोर यांच्या सत्कार प्रसंगी श्रीमती आशा भोसले भाषण करताना



मा. श्री. शरदराव पवार व श्री. सुंदरलाल बहुगुणा.



श्री. टी. एन. शानभाग यांची पुस्तकतुला स



स्थानिक स्वराज्य संस्था-वित्त आ
मा. ना. आर. आर.

# चित्रे



वत श्री. अरुण टिकेकर, संपादक लोकसत्ता.



ोग कार्यशाळेचा समारोप करताना
टील, मंत्री ग्रामविकास.



ग्रंथोत्सव २००० चे उद्घाटन प्रसंगी



मा. यशवंतराव चव्हाण यांच्या ८८ व्या जयंती समारंभात बोलताना
मा. ना. छगनराव भुजबळ, उपमुख्यमंत्री.




मा. श्री. शरदराव पवार व डॉ. अभय बंग.

## विभागीय कार्यालयांचे कार्यक्रम



पुणे विभागीय केंद्र आयोजित
शिल्प कुटीर कार्यशाळा सारसबाग, पुणे
श्री. अंकुश काकडे, श्री. ज्ञानेश्वर खैरे,
श्री. शांतिलाल सुरतवाला



यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई
विभागीय केंद्र-कऱ्हाड
महिला मेळावा




स्व. यशवंतराव चव्हाण जयंती समारोह
श्री. गिरीश गांधी प्रास्ताविक करतांना
मंचावर उपस्थित श्री. मधुकरराव भावे,
यादवराव भोयर, माजी आमदार
आणि डॉ. अक्षयकुमार काळे.

- कोवाड, ता. चंदगड येथे २९ मार्च २००१ रोजी प्रौढ निरंतर शिक्षण व विस्तार कार्य विभाग, शिवाजी विद्यापीठ, कला महाविद्यालय, कोवाड यांच्या समन्वयाने व कराड केंद्र महिला व्यासपीठातर्फे 'गांडूळ आणि नैसर्गिक खते निर्मिती' हे कृतिसत्र भरविण्यात आले होते.

इ) यशवंतराव चव्हाण व्याख्यानमाला २००१, दि. ११ व १२ मार्च २००१ रोजी प्रा. डॉ. दत्ता भगत, मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद यांची 'भारतीय स्वातंत्र्याची चळवळ' आणि 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर' या विषयावर सलग दोन व्याख्याने झाली.

ई) १२ मार्च रोजी स्वातंत्र्यसैनिक कराड तालुका समिती व कराड केंद्राच्या सहकार्याने मा. यशवंतराव चव्हाण यांची जयंती साजरी करण्यात आली. प्रमुख वक्ते खासदार सुशिलकुमार शिंदे, मा. यशवंतराव मोहिते, स्वातंत्र्यसैनिक जी.डी.लाड, मा. नागनाथआण्णा नायकवडी, आमदार दिघोळे यांची व्याख्याने झाली. याचवेळी मा. सुशिलकुमार शिंदे यांचे हस्ते प्रा. डॉ. गंगाधर कायंदे-पाटील यांनी लिहिलेल्या 'यशवंतराव चव्हाण' या पुस्तकाचा प्रकाशन समारंभ संपन्न झाला.

उ) यशवंतराव चव्हाण यांचे कराड येथील निवासस्थान विरंगुळा: सदर वास्तूची देखभाल करण्याची जबाबदारी दि कराड जनता सहकारी बँक लि. कराड यांनी घेतली आहे. कराड केंद्राचे कामकाज सदर वास्तूमध्ये चालू आहे.

## क) पुणे विभागीय केंद्र:

या केंद्राचे श्री. ज्ञानेश्वर खैरे अध्यक्ष, श्री.शांतीलाल सुरतवाला(माजी महापौर) खजिनदार व श्री. अंकुश काकडे(माजी महापौर) चिटणीस आहेत.

अ. सन २०००-२००१ या आर्थिक वर्षात कला, क्रिडा या विषयांना प्राधान्य देण्याच्या उद्देशाने पुणे केंद्र सतत प्रयतनशील राहिले आहे. लोककला-नाट्य चळवळीस प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने राष्ट्रपती पुरस्कार विजेते ज्येष्ठ लोककलावंत कै. दादू इंदुरीकर लिखित 'गाढवांच लग्न' या गाजलेल्या लोकनाट्याचे, प्रकाश इनामदार व जयमाला इनामदार या कसलेल्या कलावंतांनी सादरीकरण केलेल्या, २००० व्या प्रयोगाचे आयोजन प्रतिष्ठानच्या पुणे विभागीय केंद्राच्या वतीने पुण्याच्या बालगंधर्व रंगमंदिरात करण्यात आले होते. कार्यक्रम प्रसंगी सन्माननीय कलावंतांचा गौरव पुणे केंद्राचे अध्यक्ष मा. ज्ञानेश्वर खैरे यांच्या हस्ते करण्यात आला.

ब. डिसेंबर २००० च्या अखेरीस शिल्पकारांना प्रोत्साहन मिळावे व शिल्पकृती कशा घडविल्या जातात याची प्रत्यक्ष अनुभूति पुणेकरांना मिळावी या उद्देशाने महाराष्ट्र व गुजरात या दोन राज्यांतील अंतरराष्ट्रीय ख्यातकीर्त शिल्पकारांच्या उपस्थितीत ८ दिवसांच्या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यशाळेला महाराष्ट्र व गुजरातमधील १४ शिल्पकारांनी उपस्थित राहून सलग आठ दिवस पुणेकरांना शिल्पकृती कशी घडविली जाते याची अनुभूति दिली. या आठ दिवसांच्या कालावधीत पुण्यांतील सुमारे २५,००० नागरीकांनी भेट देऊन प्रतिष्ठानच्या या उपक्रमास उस्फूर्त प्रतिसाद दिला. या आठ दिवसांच्या कार्यशाळेत शिल्पकारांच्या कौशल्याने साकार केलेल्या निवडक शिल्पकृती पुणे महानगरपालिकेला प्रतिष्ठानच्या वतीने प्रेमपूर्वक भेट देण्यात आल्या.

क. जानेवारी २००१ च्या शेवटच्या आठवड्यात जम्मूमधील ८० युवक-युवतींच्या जथ्थ्यास पुणे भेटीचे आमंत्रण देण्यात आले होते. या आमंत्रणाचा स्वीकार करून ५० मुली व ३० मुलांचा जथ्था पुणे भेटीस आला होता. या भेटी दरम्यान पुण्यातील विविध शैक्षणिक, सामाजिक व आर्थिक संस्थांच्या भेटीचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. तसेच पुणेकरांसाठी पुण्यातील मध्यवर्ती सारसबाग परिसरात या काश्मिरी जथ्थ्याचा सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित केला होता. या कार्यक्रमाने 'हम आपके साथ है'। ची जाणीव करून देऊन काश्मिर-पुणे मैत्रीचा सेतू बांधण्याचे महत्त्वपूर्ण काम केले. या जथ्थ्याच्या पूर्ण कार्यक्रमाचे आयोजन व नियोजन पुणे केंद्राचे शांतीलाल सुरतवाला, अंकुश काकडे व त्यांच्या सहकाऱ्यांनी केले.

## ड) नागपूर विभागीय केंद्र:

अ. मे २००० रोजी महाराष्ट्र दिनानिमित्त नाविन्य अकादमीतर्फे वैदर्भीय कवींच्या रचनांवर आधारित

वैशिष्ट्यपूर्ण 'काळ्या मातीत मातीत' हा कार्यक्रम सादर करण्यात आला. या कार्यक्रमाला नागपूर सुधार प्रन्यासचे तत्कालीन सभापती श्री.डब्ल्यु.जी. गोरडे प्रमुख अतिथी तर कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी श्री. गिरीश गांधी उपस्थित होते. डॉ. दत्ता हरकरे, सौ. माधुरी आशिरगडे, विनोद वखरे, सीमा रामले, भाग्यश्री वारसकर व गोपाळ कौशिक इत्यादी कलावंतांनी वैदर्भीय कवींची गीते सादर केली. अडीचतास रंगलेल्या मैफिलीला रसिकांची भरगच्च उपस्थिती लाभली होती.

ब. **व्यक्तिमत्त्व विकास व संस्कार कार्यशाळा:** शालेय विद्यार्थ्यांसाठी 'अथर्व आणि अथर्व उत्कर्ष' संस्थेच्या सहकार्याने ९ मे ते २८ मे २००० या वीस दिवसांसाठी स्व.श्रीकांत कुलकर्णी स्मृति व्यक्तिमत्त्व विकास व संस्कार कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. शिबिरामध्ये जवळपास सव्वाशे विद्यार्थी सहभागी झाले होते. शिबिरामध्ये वक्तृत्व, अभिनय, वृत्तवाचन, इंटरनेट व प्रसार माध्यमांची ओळख, अंधश्रद्धा निर्मूलन, योगासन, आत्मसंरक्षण अशा विविध विषयांवर विदर्भातील त्या त्या क्षेत्रातील मान्यवर तज्ज्ञांनी मार्गदर्शन केले. शिबिराचा समारोप समारंभ रविवार दि. २८ मे २००० रोजी श्री.बबनराव पाचपुते यांचे हस्ते व तत्कालीन अपर पोलीस आयुक्त श्री.प्रवीण दीक्षित यांचे अध्यक्षतेखाली संपन्न झाला. याप्रसंगी नागपूर सुधार प्रन्यासचे तत्कालीन सभापती श्री.डब्ल्यु.जी.गोरडे, माजी आमदार श्री.विनायकराव मेटे विशेष अतिथी म्हणून उपस्थित होते. याप्रसंगी शिबिरार्थींनी विविध सांस्कृतिक कार्यक्रम सादर केले.

क. **उन्हाळी चित्रकला शिबीर:** रंगप्रवाह कल्चरल अकादमीच्या सहकार्याने याही वर्षी तीन ठिकाणी १० मे ते १० जून २००० या कालावधीत चित्रकला शिबिरे संपन्न झाली. या शिबिरांचा अडीचशे विद्यार्थ्यांनी लाभ घेतला. सर्व शिबिरांचा संयुक्त समारोप, पुरस्कार व प्रमाणपत्र वितरण समारंभ रविवार दि. २५ जून २००० रोजी आमदार श्री.धर्मरावबाबा आत्राम यांचे हस्ते व चित्रकला महाविद्यालयाचे प्राचार्य श्री. कमलेश सश्राम यांचे अध्यक्षतेखाली संपन्न झाला.

ड. **अवघे गर्जे पंढरपूर:** आषाढी एकादशीच्या पूर्वसंध्येला नाविन्य कला अकादमीच्या सहकार्याने 'अवघे गर्जे पंढरपूर' हा अभंग व भक्ती संगीताचा विशेष कार्यक्रम संपन्न झाला. श्री. गुणवंत घटवाई, डॉ. दत्ता हरकरे, कु. रुपाली सराफ, श्रीमती नीता पांडे, सौ. माधुरी आशिरगडे व कु. कल्याणी आमलेकर इत्यादी कलावंतांनी भावपूर्ण भक्तिगीते व अभंग सादर केली. सर्व गायक आणि वादक कलावंताचा ज्येष्ठ साहित्यिक श्री. मारुती चितमपल्ली यांचे हस्ते सत्कार करण्यात आला.

इ. **रसिकाग्रणी श्रीमंत बाबूराव देशमुख जन्मशताब्दी सांगता समारोह:** श्रीमंत बाबूराव देशमुख जन्मशताब्दी सांगता समारोह दि. १२ व १३ जुलै रोजी साजरा करण्यात आला. १२ जुलै रोजी नागपुरातील संगीततज्ञ श्री. श्रीराम सप्रे आणि चमूने 'नभ मेघांनी आक्रमिले' हा नाट्यगीतांचा कार्यक्रम सादर केला. हा कार्यक्रम महाल येथील देशमुख वाड्यात पार पडला. याप्रसंगी तत्कालीन महापौर श्रीमती वसुंधराताई मसुरकर प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होत्या. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ संगीत तज्ञ प्राचार्य प्रभाकरराव देशकर तर विशेष अतिथी म्हणून प्रा. अरविंद खांडेकर उपस्थित होते.

ई. **महाविद्यालयीन नाट्य प्रशिक्षण शिबीर:** दि. २२ ते ३० ऑगस्ट या कालावधीत संपन्न झालेल्या शिबिराचे उद्घाटन सिनेअभिनेत्री मधु कांबीकर यांचे हस्ते व रंगभूमी प्रयोग परिनिरीक्षण मंडळाचे अध्यक्ष श्री. फ.मु.शिंदे यांचे अध्यक्षतेखाली तसेच श्री. गिरीश गांधी, विलास इंगोले, डॉ. वंदना मोहोड यांचे प्रमुख उपस्थितीत अमरावती विद्यापीठ येथे झाले.

उ. **वैदर्भीय कलावंत मेळावा:** विभागीय केंद्र नागपूर, अ.भा.मराठी नाट्य परिषद नागपूर आणि कलाभारती जिगीषा, अमरावती यांच्या संयुक्त विद्यमाने दि. २४ ऑगस्ट रोजी अमरावती येथे वैदर्भीय कलावंत मेळाव्याचे आयोजन केले होते. कलावंत मेळाव्याच्या अध्यक्षस्थानी सुप्रसिद्ध नाट्यसमीक्षक प्रा. माणिक कानेड हे होते. ज्येष्ठ अभिनेत्री श्रीमती मर्लीन कर्वे इनामदार, मधु कांबीकर, रंगभूमी प्रयोग परिनिरीक्षण मंडळाचे अध्यक्ष श्री. फ.मु.शिंदे, श्री. रामदासजी फुटाणे, श्री. अशोक खंडे इत्यादी मान्यवर मेळाव्याला प्रामुख्याने उपस्थित होते. 'विदर्भातील व्यावसायिक रंगभूमी उभी होणे शक्य नाही' या परिसंवादाच्या अध्यक्षस्थानी नाट्य दिग्दर्शक श्री. राम जाधव होते.

ऊ. **कै. सखारामपंत जोशी आणि कै. शरद आंबेकर स्मृति पुरस्कार वितरण समारंभ:** राज्य नाट्य स्पर्धा, नागपूर केंद्रस्तरीय पुरस्कार विजेत्या कलावंताचा सत्कार व कै. सखारामपंत जोशी आणि कै. शरद

आवेकर स्मृति पुरस्कार वितरण समारंभ 'नाट्यवलय' नागपूर व विभागीय केंद्राच्या संयुक्त विद्यमाने रविवार दि. १० सप्टेंबर २००० रोजी संपन्न झाला.

ए. **राष्ट्रपिता महात्मा गांधी आणि भारताचे माजी पंतप्रधान स्व.लालबहादूर शास्त्री यांचा जन्मदिन:** दि. २ ऑक्टोबर २००० रोजी विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी केशवनगर प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक श्री. श्रीकांत पाचपोर हे होते सौ. वर्षा अवधून प्रमुख अतिथी म्हणुन उपस्थित होत्या.

ऐ. **पं. जवाहरलाल नेहरु जयंतीनिमित्त बालकथाकारांचे कथाकथन:** आधुनिक भारताचे शिल्पकार आणि भारताचे पहिले पंतप्रधान स्व. पं. जवाहरलाल नेहरु यांचा जन्मदिवस बालकदिन म्हणून सर्वत्र साजरा करण्यात येतो. बालकथाकथनाचा कार्यक्रम दि. १४ नोव्हेंबर २००० रोजी आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मानव मंदिराचे विश्वस्त व विभागीय केंद्राचे सरचिटणीस श्री. अनंतराव धारड तसेच प्रमुख अतिथी म्हणून निर्मल उज्वल को. ऑपरेटिव्ह बँकेचे अध्यक्ष श्री. प्रमोद मानमोडे व डॉ. मनमोहन राठी उपस्थित होते.

ओ. **साहित्यिक वार्तालाप कार्यक्रम:** विभागीय केंद्र नागपूर आणि माग्रस यांच्या संयुक्त विद्यमाने दि. ११ नोव्हेंबर, २००० रोजी मराठीतील प्रख्यात साहित्यिक श्री. रंगनाथ पठारे यांचेशी अनौपचारिक साहित्यिक वार्तालाप कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. श्री. रंगनाथ पठारे यांच्या 'ताम्रपट' या कादंबरीला अलीकडेच साहित्य अकादमी पुरस्कार मिळाला. वार्तालाप कार्यक्रमात माग्रसचे श्री. सुधीर देव व साहित्य क्षेत्रातील मान्यवर मंडळीचा सहभाग होता.

औ. **जागतिक पातळीवरील नागपूरच्या प्रज्ञावंतांचा सत्कार:** लहान वयातच जागतिक विक्रम प्रस्थापित करणाऱ्या नागपूरातील दोन प्रज्ञावंतांचा सत्कार नागपूर विभागीय केंद्राच्यावतीने करण्यात आला. संगणक क्षेत्रामध्ये नागपूरातील कुमार अक्षय झडगावकर याने वयाच्या १३ व्या वर्षी शालेय शिक्षण सुरु असताना जागतिक स्तरावरील मायक्रोसॉफ्ट सर्टिफाईड सोल्युशन डेव्हलपर ही परीक्षा प्रावीण्यासह उत्तीर्ण करून एक जागतिक विक्रम प्रस्थापित केला आहे.

नासा, प्लॅनेटरी सोसायटी आणि जे.पी.एल. अमेरिका यांच्या वतीने आयोजित जागतिक निबंध स्पर्धेत नागपूरचा बालशास्त्रज्ञ कुमार तन्मय खिरवडकर याच्या 'रेड रोव्हर गोज टू मार्स' या निबंधाची निवड करण्यात आली आणि मिशन टू मार्स २००३ साठी नासा, अमेरिका येथे लँडींग साईट सिलेक्ट करण्यासाठी जगातील ९ (नऊ) बालशास्त्रज्ञांमध्ये तन्मयची निवड झाली आहे. वयाच्या तेराव्यावर्षी तन्मयने हे जागतिक स्तरावरील यश संपादन केले आहे. अशा दोन प्रज्ञावंत बालशास्त्रज्ञांचा नागपूर विभागीय केंद्राच्या वतीने केंद्र प्रमुख श्री. गिरीश गांधी यांचे हस्ते यथोचित सत्कार करण्यात आला व भावी आयुष्यासाठी शुभेच्छा देण्यात आल्या.

अं. **स्व. यशवंतराव चव्हाण पुण्यतिथी समारोह:** स्व. यशवंतराव चव्हाण यांची २५ नोव्हेंबर ही पुण्यतिथी आहे. यानिमित्ताने नागपूर विद्यापीठाचे ज्येष्ठ सिनेट सदस्य डॉ. वेदप्रकाश मिश्रा यांचे 'स्व. यशवंतराव चव्हाण-व्यक्ती व कार्य' या विषयावरील व्याख्यान आयोजित केले होते. या कार्यक्रमाला नागपुरातील विविध क्षेत्रातील गणमान्य व्यक्ति आवर्जून उपस्थित होत्या.

अः **महात्मा ज्योतिबा फुले पुण्यतिथी:** विभागीय केंद्र नागपूर आणि मानव मंदिर यांच्या संयुक्त विद्यमाने क्रांतिज्योती महात्मा ज्योतिबा फुले यांच्या पुण्यतिथीनिमित्त मंगळवार दि. २८ नोव्हेंबर २००० रोजी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी नगरसवक श्री. प्रकाश गजभिये हे होते. प्रमुख अतिथी म्हणून श्री. भाऊराव सोनपिंपळे उपस्थित होते. याप्रसंगी साक्षरता अभियानात यशस्वी ठरलेल्या महिलांचा सत्कार श्री. राजकुमार वंजारी आणि श्री. विनायक गणवीर यांच्या हस्ते करण्यात आला.

ख. **'दलित साहित्य समीक्षा' व 'ग्रामीण साहित्य समीक्षा':** दि. २ व ३ मार्च २००१ ला 'दलित साहित्य समीक्षा' व 'ग्रामीण साहित्य समीक्षा' या विषयांवर दोन दिवसांच्या चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले होते. दि. २ मार्च २००१ रोजी संपन्न झालेल्या 'दलित साहित्य समीक्षा' या विषयावरील चर्चासत्राचे

अध्यक्ष म्हणून सुप्रसिद्ध ज्येष्ठ साहित्यिक डॉ. गंगाधर पानतावणे उपस्थित होते. पहिल्या सत्रात 'दलित कादंबरी' या विषयावर प्रख्यात विचारवंत डॉ. वि.स.जोग यांचे भाषण झाले. त्यानंतर 'दलित कथा' या विषयावर डॉ. योगेंद्र मेश्राम यांनी आपले विचार मांडले. दुसऱ्या सत्रामध्ये डॉ. आरती कुलकर्णी यांनी 'दलित आत्मकथने' तर डॉ. अनिल नितनवरे यांनी 'दलित कविता' या विषयांवरील निबंध सादर केले. दि. ३ मार्च २००१ रोजी आयोजित 'ग्रामीण साहित्य समीक्षा' या विषयावरील चर्चासत्राला सुप्रसिद्ध साहित्यिक डॉ. आनंद यादव अध्यक्ष म्हणून लाभले होते. चर्चासत्राच्या पहिल्या सत्रात 'ग्रामीण कविता' या विषयावर डॉ. आशाताई सावदेकर यांनी तर 'ग्रामीण कथा' या विषयी डॉ. प्रमोद मुनघाटे यांनी आपले विचार व्यक्त केले. दुसऱ्या सत्रात कथाकार, कादंबरीकार डॉ. किशोर सानप यांनी 'ग्रामीण कादंबरी' या विषयावर आपले विचार मांडले.

ग. **स्व. यशवंतराव चव्हाण जयंती समारोह:** स्व. यशवंतराव चव्हाण यांच्या जयंतीदिनाच्या निमित्ताने महाराष्ट्रातील ज्येष्ठ पत्रकार श्री. मधुकर भावे यांचे व्याख्यान माजी आमदार श्री. यादवराव भोयर यांचे अध्यक्षतेखाली संपन्न झाले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक विभागीय केंद्राचे प्रमुख श्री. गिरीश गांधी यांनी केले. सूत्रसंचालन डॉ. अक्षयकुमार काळे आणि आभार प्रदर्शन श्री. विवेक रवेर यांनी केले. मुख्य कार्यक्रमानंतर विदर्भातील नामवंत कवींचे 'सूक्त संध्या' हे कविसंमेलन संपन्न झाले. कवि संमेलनाच्या अध्यक्षस्थानी सुप्रसिद्ध कवी प्रा. ज्ञानेश वाकुडकर हे होते.

## १३. वार्तापत्र:

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबईच्या वतीने प्रतिष्ठानच्या सभासदांना कार्यक्रम/उपक्रम यांची माहिती मिळावी यासाठी तीन महिन्यातून एकदा वार्तापत्र प्रसिद्ध करण्यात येते. या वार्तापत्रामध्ये रंगस्वरतर्फे होणारे सांस्कृतिक कार्यक्रम, नवभारत युवा आंदोलन, महाराष्ट्र महिला व्यासपीठाचे युवक व महिलांसाठी आयोजित केले जाणारे विविध उपक्रम त्याचप्रमाणे कृषी व सहकार व्यासपीठ, मोफत कायदेविषयक सहाय्य व सल्ला फोरम, ग्रंथालय, 'प्रथम-मुंबई शिक्षण उपक्रम', माहिती व तंत्रज्ञान प्रबोधिनी शिवाय कराड पुणे व नागपूर या प्रतिष्ठानच्या विभागीय केंद्रांचे कार्य यासंबंधी सविस्तर अहवाल प्रसिद्ध होतो. वार्तापत्राच्या वाचकांना यशवंतराव चव्हाण यांच्या विचारांचे मार्गदर्शन व्हावं यासाठी विविध विषयावरील त्यांचे लेख समाविष्ट केले जातात. त्याचप्रमाणे प्रतिष्ठानने घेतलेल्या स्पर्धामध्ये पहिला क्रमांक मिळालेल्या विद्यार्थ्यांच्या साहित्याचाही समावेश वार्तापत्रात केलेला आहे. मा. शरद काळे, मा. बापूसाहेब रवैरे व डॉ. रवि बापट हे वार्तापत्रासाठी वेळोवेळी बहुमूल्य सल्ला देत असतात. श्रीमती रेखा नार्वेकर मानद संपादक म्हणून संपादनाची सर्व जबाबदारी सांभाळतात. अहवाल वर्षात जुलै, २००० नोव्हेंबर २००० व मार्च २००१ या महिन्यांत वार्तापत्राचे तीन अंक प्रसिद्ध झाले.

**विश्वस्तमंडळ/कार्यकारिणी**
यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई

**मुंबई,**

**दिनांक:** १५ **सप्टेंबर**, २००१

# यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई

| | | |
|---|---|---|
| कृषी व सहकार | निमंत्रक | श्री. ज्ञानेश्वर खैरे |
| महाराष्ट्र महिला व्यासपीठ | संयोजिका | श्रीमती शारदा साठे |
| नवभारत युवा आंदोलन | संयोजक | श्री. प्रेमानंद रुपवते |
| | संघटक | श्री. दत्ता बाळसराफ |
| सांस्कृतिक विभाग | निमंत्रक | श्री. विनय नेवाळकर |
| | | श्री. सुनिल वालावलकर |
| नागरी कायदेविषयक सहाय्य व सल्ला फोरम | अध्यक्ष | श्री. सत्यरंजन धर्माधिकारी |
| | सचिव | श्री. म.वा. पवार |
| वार्तापत्र | मानद संपादक | श्रीमती रेखा नार्वेकर |
| यशवंतराव चव्हाण ग्रंथालय | ग्रंथपाल | श्री. वा.रा.कामत |
| | सहाय्यक ग्रंथपाल | श्री. अनिल पुंडलिक पाजारे |
| यशवंतराव चव्हाण सभागृह व कलादालन | व्यवस्थापक | श्री. विजय देसाई |
| यशवंतराव चव्हाण माहिती व तंत्रज्ञान प्रबोधिनी | संचालक | ब्रिगेडीअर-श्री. सुशील गुप्तन |
| | मुख्य तांत्रिक अधिकारी | श्री. मयुर परांजपे |
| | मुख्य पणन अधिकारी | श्री. विक्रम वासुदेव |
| पंचायत राज प्रशिक्षण प्रकल्प | आर्थिक सल्लागार | श्री. व्ही. गणपती |
| पूर्व-प्राथमिक शिक्षण उपक्रम | कार्यकारी सचिव | डॉ. माधव चव्हाण |
| मानद वास्तुविशारद | | मेसर्स शशी प्रभू अँण्ड असोशिएटस् |
| अभियांत्रिकी मानद सल्लागार | | श्री. गोविंदराव काकडे |
| सांविधिक लेखा परीक्षक | | मे.के.वी.म्हेत्रे आणि कंपनी (२२.५.२००० पर्यंत) |
| | | श्री. विलास के.शहा अँण्ड कंपनी (२३.५.२००० पासून) |
| अंतर्गत हिशोब तपासनीस | | मेसर्स पोक्षे-कुलकर्णी आणि कंपनी |
| आयकर सल्लागार | | श्री. एस.एस. फडकर |

# प्रतिष्ठानची नवी प्रकाशने



मा. यशवंतराव चव्हाण यांची
संसदेतील भाषणे खंड तीन व चारचे प्रकाशन



सह्याद्रीचे वारे या पुस्तकाचे हिंदी भाषांतर
''**हवाएं सह्याद्री की**'' चे प्रकाशन (महाराष्ट्र शासन प्रकाशन)



महाराष्ट्राची चार दशकातील वाटचाल: एक आढावा
(य.च.प्रतिष्ठान व महाराष्ट्र आर्थिक विकास मंडळ
यांचे संयुक्त प्रकाशन)



''शब्दांचे सामर्थ्य'' (मान. श्री. राम प्रधान संपादित) चे
प्रकाशन

# यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई

## प्रतिष्ठानची विक्रीसाठी असलेली प्रकाशने:

| | | किंमत रुपये |
|---|---|---|
| १ | यशवंतराव चव्हाण: विधी मंडळातील निवडक मराठी भाषणे भाग १<br>संकलन- डॉ. व्ही. जी. खोबरेकर | २००.०० |
| २ | वाय.बी.चव्हाण: सिलेक्टेड स्पीचेस-विधीमंडळ भाग २<br>संकलन-डॉ.व्ही.जी.खोबरेकर | २५०.०० |
| ३ | सिलेक्टेड स्पीचेस इन पार्लमेंट-वाय.बी.चव्हाण खंड १ ते ४<br>संपादन-राम प्रधान | प्रत्येकी २५०.०० |
| ४ | यशवंतराव चव्हाण यांचे मौलिक विचार संकलन- ना.धों. महानोर | ३.५० |
| ५ | सह्याद्रीचे वारे- यशवंतराव चव्हाण | ३०.०० |
| ६ | म. ज्योतिबा फुले यांचे निवडक विचार संकलन- प्रा.गजमल माळी | १२.०० |
| ७ | बेकारी निर्मूलनातून ग्रामीण विकास-संपादक- वि.स.पागे | ३५.०० |
| ८ | महाराष्ट्रातील दुष्काळ आणि जलसंपत्तीचे नियोजन-संपादन- अण्णासाहेब शिंदे | १६०.०० |
| ९ | महाराष्ट्र: एक दृष्टिकोन-शरदराव पवार-भाषणसंग्रह-संपादन- दादासाहेब रुपवते | ७५.०० |
| १० | पंचायत राज, जिल्हा नियोजन आणि ग्रामीण विकास-संपादन- पी.बी.पाटील | १००.०० |
| ११ | नवभारत: परिवर्तनाची दिशा-संपादन- पी.बी.पाटील | ७५.०० |
| १२ | विमुक्तायन: महाराष्ट्रातील विमुक्त जमाती: चिकित्सक अभ्यास<br>संशोधक / लेखक-लक्ष्मण माने | २५०.०० |
| १३ | महिलांसंबंधीचे धोरण: स्वयंसिद्धतेकडे वाटचाल-डॉ. नीलम गोऱ्हे | १५.०० |
| १४ | यशवंतराव चव्हाण-चरित्र-लेखक-अनंतराव पाटील | ८०.०० |
| १५ | शब्दांचे सामर्थ्य - संपादन, राम प्रधान | ३७५.०० |
| १६ | महाराष्ट्राची चार दशकांतील वाटचाल : एक आढावा (इंग्रजी)<br>(यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई व महाराष्ट्र आर्थिक विकास मंडळ यांचे संयुक्त प्रकाशन) | २५०.०० |

## व्हिडीओ कॅसेटस्

- मी एस.एम.: एस.एम जोशी यांचा जीवनपट
- तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी: तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांचा जीवनपट
- प्रवासी पक्षी: सुप्रसिद्ध साहित्यिक कुसुमाग्रज यांचा जीवनपट
- पुल वृत्तांत: पु.ल. देशपांडे यांचा जीवनपट

  या चारही व्हिडीओ कॅसेटसची निर्मिती यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानने केली असून दिग्दर्शनाची जबाबदारी डॉ. जब्बार पटेल यांनी पार पाडली.

- कॉ. केशवराव जेधे: कॉ. केशवराव जेधे यांचा जीवनपट
  दिग्दर्शन- श्री. राम गवाले.